आजादी का अमृत महोत्सव अनुवादप्रकल्प ग्रंथावली – 7

# तेजोबिन्दुपनिषद्


अनुवादक

**अमृता सोहोनी**

प्रधान संपादक

**कुलगुरू,**

कुलगुरू, क.का.सं.वि., रामटेक

संपादक

**प्रो. कृष्णकुमार पाण्डेय**

संचालक, संशोधन व प्रकाशन विभाग



राष्ट्रहिताय संस्कृतम्

**कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक**

राष्ट्रीय मूल्यांकन व प्रत्यायन परिषदद्वारा (NAAC) A+ श्रेणी प्राप्त

२०२५

**शीर्षक** - **तेजोबिन्दुपनिषद्**

**अनुवादक** - **अमृता सोहोनी**

**प्रधान संपादक** - **कुलगुरू,**
**क.का.सं.वि., रामटेक**

**संपादक** - **प्रो. कृष्णकुमार पाण्डेय**
**कुलगुरू, क.का.सं.वि., रामटेक**

**आजादी का अमृत महोत्सव अनुवाद प्रकल्प समिती**

1. डॉ. मधुसूदन पेन्ना - अध्यक्ष
2. प्रा. नंदा पुरी - सदस्य
3. प्रा. कृष्णकुमार पाण्डेय - सदस्य
4. प्रा. ललिता चंद्रात्रे - सदस्य
5. प्रा. हरेकृष्ण अगस्ती - सदस्य
6. प्रा. कविता होले - सदस्य
7. प्रा. प्रसाद गोखले - सदस्य
8. प्रा. पराग जोशी - सदस्य

© (Copyright with Publisher)

प्रकाशक - कुलसचिव, क.का.सं.वि., रामटेक ४४११०६

प्रकाशन वर्ष - २०२५

आवृत्ती - प्रथम

आय.एस.बी.एन. - ९७८-८१-१९२२७-८८-९

मूल्य - २३०.००

मुखपृष्ठ - श्री. उमेश पाटील

मुद्रक - मे. लाभ प्रिंट अँड पब्लिकेशन, नागपूर

---

The Kavikulaguru Kalidas University does not hold any responsibility regarding the content, language, originality, plagiarism or views expressed by the author of this book. The respective author is solely responsible.

# तेजोबिन्दूपनिषद्

## भूमिका

वेद व शाखा* -तेजोबिंदु उपनिषद् हे कृष्ण-यजुर्वेदाच्या कठ शाखेशी संबंधित आहे.

प्रस्तुत उपनिषदांत एकुण ६ अध्याय आहेत. त्यात खालीलप्रमाणे अध्याय आहेत -

अध्याय १ - ५०

अध्याय २- ४३

अध्याय ३ - ७४

अध्याय ४ - ८१

अध्याय ५ - १०५

अध्याय ६ - ११०

------------------------

एकुण = ४६३ पद्य

## प्रतिपाद्य विषय -

या उपनिषदाचा प्रतिपाद्य विषय ज्ञानयोग आहे जो अद्वैत वेदांताचा भाग आहे. तेजोबिंदूपनिषदाचा मराठी सारांश:

1. आत्मा आणि ब्रह्माची ओळख: तेजोबिंदूपनिषद सांगते की आत्मा आणि ब्रह्म यामध्ये कोणताही फरक नाही. आत्मा हा अनादी, अजर, अमर, आणि निर्गुण आहे. ब्रह्म हेच अंतिम सत्य आहे आणि आत्मा त्या ब्रह्माचेच स्वरूप आहे.

2. ध्यान आणि साधना: या उपनिषदात ध्यानाच्या महत्त्वावर भर दिला आहे. ध्यानाद्वारे साधक आपल्या आत्म्याची ओळख करून ब्रह्माशी एकरूप होऊ शकतो. ध्यान ही मुक्तीची गुरुकिल्ली आहे.

3. गुरूचे महत्त्व: गुरूला अत्यंत महत्त्व दिले आहे. गुरूशिवाय आत्मज्ञानाची प्राप्ती होणे कठीण आहे. गुरूच्या कृपेमुळेच ब्रह्माची अनुभूती शक्य होते.

4. मुक्ती आणि त्याचे स्वरूप: मुक्ती म्हणजे पुनर्जन्माच्या चक्रातून मुक्त होणे आणि ब्रह्माशी एकरूप होणे. ही मुक्ती आत्मज्ञानानेच प्राप्त होते.

5. योग व तत्त्वज्ञान: उपनिषदात विविध योगपद्धती, विशेषतः ध्यानयोगाचे महत्त्व वर्णन केले आहे. ज्ञानयोग, भक्तियोग व कर्मयोगाचेही वर्णन आढळते.

---

## मुख्य संदेश:

"तूच ब्रह्म आहेस" — हे या उपनिषदाचे मुख्य तत्त्व आहे. आत्मा आणि ब्रह्म वेगळे नसून, त्यांच्या एकत्वाची अनुभूतीच सर्वोच्च मुक्ती आहे.

**॥शान्तिपाठः ॥**

**ॐ सहनाववतु सहनौ भुनक्तु सह वीर्य करवावहै।**

**तेजेस्विनावतीतमस्तु मा विद्विषावहै।**

**ओं शान्तिः शान्तिः शान्तिः**

(हे परमेश्वर)आम्ही दोघे गुरु व शिष्य यांची समवेतच रक्षा करा, सोबतच आमचे दोहोंचे पालन होवो, आम्ही दोघे समवेतच समान शक्ति संपन्न होवो.आमचे (मिळून केलेले) अध्ययन तेजोमय होवो.आमच्या मनात एकमेकांप्रती द्वेषभावना उत्पन्न न होवो.

ओम् शान्ति: शान्ति: शान्ति: |

# ॥ अथ प्रथमोऽध्यायः ॥

**ॐ तेजोबिन्दुः परं ध्यानं विश्वात्महृदि संस्थितम् ।**
**आणवं शांभवं शान्तं स्थूलं सूक्ष्मं परं च यत् ॥ १ ॥**

तेजबिंदु या शब्दाचा अर्थ हृदयात वसलेल्या प्रकट विश्वाच्या आत्म्याचे ध्यान. हा स्वता अणु आहे. ते कल्याण आहे, ते शांत आहे, ते स्थूल आणि सूक्ष्म यांच्या पलीकडे आहे. किंवा असेही म्हणता येईल की ते स्थूल तसेच सूक्ष्म आहे, कारण ते अत्यंत सूक्ष्म असले तरी ते दृश्य जगाच्या रूपाने स्थूल दिसते.

**दुःखाढ्यं च दुराराध्यं दुष्प्रेक्ष्यं मुक्तमव्ययम् ।**
**दुर्लभं तत्स्वयं ध्यानं मुनीनां च मनीषिणाम् ॥ २ ॥**

कारण संसार दुःखमय आहे म्हणून त्याला (दुःख बाहुल्य ) दुःखाढ्य  असे जाणल्या जाते. तो दुराराध्य है अर्थात् त्याची  सहज आराधना करणे शक्य नाही, अत्यंत कठिन है। वह दुष्प्रेक्ष्य है अर्थात् चक्षु, श्रोत्र मन आदि इंद्रियांद्वारे त्याला जाणणे अशक्य आहे जसे-  'केनोपनिषद्' मध्ये म्हंटले आहे

न तत्र चक्षुर्गच्छति न वाग्गच्छति नो न विद्मो न विजानीमो यथैतदनुशिष्यादन्यदेव तद्वितादथो अविदिताधि । इति शुश्रुम पूर्वेशां येनस्तद्वाचक्षिरे । '

(केनोपनिषद् १-३)

अर्थात् तो क्लेशकर्मादिंना मुक्त आहे, जसे  कि योगसूत्रकार पतंजलीने म्हंटले आहे कि -

'क्लेशकर्मविपाकाशयरपरमृष्टः पुरुषविशेष ईश्वरः ॥ १-२४

ते अव्यय अर्थात् अविनाशी, दुर्लभ अर्थात् सुगमतेने प्राप्त होत नाही. ते मनीषी मुनिंद्वारे ध्यानाच्या रुपात अस्तित्त्वात आहे.

**यताहारो जितक्रोधो जितसङ्गो जितेन्द्रियः ।**
**निर्द्वन्द्वो निरहंकारो निराशीरपरिग्रहः ॥ ३॥**

**अगम्यागमकर्ता यो गम्याऽगमनमानसः ।**
**मुखे त्रीणि च विन्दन्ति त्रिधामा हंस उच्यते ॥ ४ ॥**

जो साधक सुव्यवस्थित आहार घेतो, ज्याने क्रोध, संग आणि इंद्रियांना जिंकलेले आहे, जो सुखदुःखादि द्वन्द्वांच्या परे आहे, अहंकाररहित आहे. कामना रहित आहे, परिग्रह रहित आहे, जो अगम्य(अज्ञात) ला प्राप्त करणारा आहे, ज्याचे मन प्राप्तव्याला प्राप्त करणारे आहे, ज्याच्या मुखात ब्रह्माची सच्चिदानन्दस्वरूपता विद्यमान आहे आणि जो त्याला तीन्ही काळांमध्ये सत्य मानतो. तो साधक को हंस म्हणवितो.

**परं गुह्यतमं विद्धि ह्यस्ततन्द्रो निराश्रयः ।**
**सोमरूपकला सूक्ष्मा विष्णोस्तत्परमं पदम् ॥५॥**

ते परमततत्त्व ब्रह्मतत्त्व अत्यंत गहन वा गूढ़ आहे असे समजले पाहिजे. तन्द्रा वा आलस्य याचा त्यात सर्वथा अभाव आहे, तो आश्रयहीन आहे तो कुणाचा आश्रय घेत नाही , त्यांत सोमरुप परमशांतीची कला विद्यमान आहे.तो सूक्ष्मातिसूक्ष्म आहे , त्यालाच विष्णुचे परमपद समजले जाते.

**त्रिवक्त्रं त्रिगुणं स्थानं त्रिधातुं रूपवर्जितम् ।**
**निश्चलं निर्विकल्पं च निराकारं निराश्रयम् ॥ ६॥**

ते ब्रह्मतत्त्व तीन मुखांचे आहे अर्थात् ऋग्वेद, यजुर्वेद, व सामवेदाच्या माध्यमातुन ज्ञान, कर्म व उपासना संपादन करते. ते त्रिगुणात्मक आहे

अर्थात् सत्त्व, रजस् आणि तमस् तीन गुण, ज्यांना संयुक्त रूपाने प्रकृती असे म्हणतात,त्याचा हा अधिष्ठाता आहे. स्थान म्हणजे सर्वांचा आधार, त्रिधातु, स्थूल आणि परम सूक्ष्म पदार्थाचा अधिष्ठाता रुपरहित, स्थिर, निर्विकल्प, निराकार व आश्रयरहित आहे.

**उपाधिरहितं स्थानं वाङ्मनोऽतीतगोचरम् ।**
**स्वभावं भावसंग्राह्यमसंघातं पदाच्युतम् ॥ ७॥**

तो प्रत्येक प्रकारांच्या उपाधि ने रहित, सर्वांचा आश्रय, वाणी, मनाच्या मर्यादेच्या पलीकडे , स्व-भाव स्वरूप, केवळ भावद्वारा ग्रहण करण्यायोग्य, संघात रहित, अर्थात् एकमात्र आणि अच्युत (अपरिवर्तनीय) पद युक्त आहे.

**अनानानन्दनातीतं तुष्प्रेक्ष्यं मुक्तमव्ययम् ।**
**चिन्त्यमेवं विनिर्मुक्तं शाश्वतं ध्रुवमच्युतम् ॥ ८॥**

तो एक आहे, आनंदस्वरूप आहे. सीमारहित है, त्याला जाणणे दुष्कर आहे. ते सर्व बंधनांपासुन रहित अपरिवर्तनीय आहे। तो चिंतनाचा विषय है, अविद्या क्लेशांनी आणि कर्म कर्माशयापासुन सर्वथा मुक्त, शाश्वत (नित्य), निश्चल व अच्युत आहे।

**तद्ब्रह्मणस्तदध्यात्मं तद्विष्णोस्तत्परायणम्।**
**अचिन्त्यं चिन्मयात्मानं यद्व्योमं परमं स्थितम् ॥ ९ ॥**

तेच ब्रह्मपद आहे, , आत्मस्वरूप आहे, अतः ******** आहे, अध्यात्म जाता है. विष्णु द्वारे वही उपास्य आहे, तो अचिंत्य आहे, चिन्मय आहे, व्योम की समान व्यापक व सर्वोत्कृष्ट रूपात स्थित आहे.

**अशून्यं शून्यभावं तु शून्यातीतं हृदि स्थितम् ।**
**न ध्यानं च न च ध्याता न ध्येयो ध्येय एव च ॥ १० ॥**

वह शून्य स्वरूप नाही, पर भावही नाही, शूलीत आहे, तो हृदयात स्थिर आहे. तो ध्यानात आहे, न ध्याता, न ध्यास आहे, पुन्हा पुन्हा ध्यानाचा विषय आहे.

**सर्वं च न परं शून्यं न परं नापरात्परम् ।**
**अचिन्त्यमप्रबुद्धं च न सत्यं न परं विदुः ॥ ११॥**

ते सर्वमय आहे ,त्याच्या पलीकडे काहीही नाही, ते शून्यरुपही नाही , पर-अपर नाही.

ते तत्त्व अकल्पनीय आहे, ज्ञानाचा विषय नाही, ते सत्य नाही व सत्याच्या पलीकडेही नाही.

**मुनीनां संप्रयुक्तं च न देवा न परं विदुः ।**
**लोभं मोहं भयं दर्पं कामं क्रोधं च किल्बिषम् ॥ १२ ॥**

ऋषीसुध्दा त्याचे वर्णन करू शकत नाही. देवाचे वर्णन करण्यास समर्थ नाही किंवा इतर त्याला ओळखू शकत नाहीत. त्याच्यामध्ये लोभ, आसक्ती, भय, वासना, क्रोध आणि पाप नाही.

**शीतोष्णे क्षुत्पिपासे च संकल्पकविकल्पकम् ।**
**न ब्रह्मकुलदर्पं च न मुक्तिग्रन्थिसंचयम् ॥१३॥**

त्यात ना थंडी ना उष्मा, ना भूक, ना तहान, ही इच्छाशक्ती आहे. तो ब्रह्मकुलाच्या दर्पापासून रहित आहे. मुक्तीग्रंथींचाही गट नाही.

**न भयं न सुखं दुःखं तथा मानावमानयोः ।**
**एतद्भावविनिर्मुक्तं तद्ग्राह्यं ब्रह्म तत्परम् ॥ १४॥**

तो भय, सुख, दुःख, अपमान यांच्या पलीकडे आहे. सत्तेचा भाव त्यात नाही. तो परब्रह्म ग्रहणयोग्य किंवा परब्रह्म स्वरूप असा सर्वांना मान्य आहे.

**यमो हि नियमस्त्यागो मौनं देशश्च कालतः ।**
**आसनं मूलबन्धश्च देहसाम्यं च दृक्स्थितिः ॥१५॥**

**प्राणसंयमनं चैव प्रत्याहारश्च धारणा।**
**आत्मध्यानं समाधिश्च प्रोक्तान्यङ्गानि वै क्रमात् ॥ १६ ॥**

ते परब्रह्म प्राप्त करण्यासाठी योगाभ्यास आवश्यक आहे. ज्यासाठी यम, नियमाचे पालन, त्यागाची भावना, मौन, मुद्रा, मूलबंध, शरीर एकोपा, परिस्थितीचे सातत्य, विवेकबुद्धीने जीवन यापन किंवा बुद्धीचे आचरण, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, आत्म-ध्यान, त्यांना समाधीचे योगांग म्हणतात.

**सर्वं ब्रह्मेति वै ज्ञानादिन्द्रियग्रामसंयमः।**
**यमोऽयमिति संप्रोक्तोऽभ्यसनीयो मुहुर्मुहुः ॥ १७ ॥**

हे सर्व ब्रह्मरुप आहे, हे ज्ञान सम्यक जाणून घेऊन इंद्रियांचा संयम करणे म्हणजे यम होय.या यमाचा निरंतर व सातत्याने अभ्यास केला पाहिजे.

**सजातीयप्रवाहश्च विजातीयतिरस्कृतिः ।**
**नियमो हि परानन्दो नियमात्क्रियते बुधैः ॥ १८॥**

समान विचारांचा प्रवाहाच्या साधकांसह संगती करणे, तसेच विरुद्धजातीय अर्थात् सांसारिक प्रवृत्ती चा तिरस्कार करणे म्हणजे नियम होय.ही अत्यानंदाची प्राप्ती होय.बुद्धिमान साधक अहोरात्र या नियम साधनेत तत्पर असतो.

**त्यागो हि महतां पूज्यः सद्यो मोक्षप्रदायकः ॥ १९॥**

महान लोक त्यागाची साधना अत्यंत आदराने करतात आणि या साधानेद्वारेच मुक्ती मिळवितात.

**यस्माद्वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसा सह**
**यन्मौनं योगिभिर्गम्यं तद्भजेत्सर्वदा बुद्धः ॥ २० ॥**

मनासह वाणी देखील ज्या ब्रह्म तत्त्वाचे ग्रहण करण्यास असमर्थ आहे तेच ब्रह्माचे स्वरूप होय.या भावनेला मौन असे म्हणतात.योगी लोक प्रायश: या मौन साधनेतच बहुतांश दिसतात. विद्वान साधकाने निरंतर मौन साधनेसाठी प्रयत्नरत असावे.

**वाचो यस्मान्निवर्तन्ते तत्तुं न शक्यते ।**
**प्रपञ्चो यदि वक्तव्यः सोऽपि शब्दविवर्जितः ॥ २१ ॥**

**इति वा तद्भवेन्मौनं सर्वं सहजसंज्ञितम् ।**
**गिरां मौनं तु बालानामयुक्तं ब्रह्मवादिनाम् ॥ २२ ॥**

जेथपर्यंत वाणी पोहोचूच शकत नाही त्याचे वर्णन कसे करता येयील बरं? अर्थात् करता येणे शक्य नाही.त्या ब्रह्मतत्त्वाचा विस्तार हा मर्यादेपलीकडे आहे हे जे मनोभाव तेच मौन म्हंटल्या जाते.याला सहज मौन असे म्हणतात.वाणीचे मौन हे खरे मौन नव्हे,ती सामान्यांची धारणा आहे, ब्रह्मवादि लोकांसाठी तेच उपयुक्त नाही

**आदावन्ते च मध्ये च जनो यस्मिन्न विद्यते।**
**येनेदं सततं व्याप्तं स देशो विजनः स्मृतः ॥ २३ ॥**

ज्या स्थानावर आदि, मध्यभागी, आणि अन्तीम स्थानी कोणताही प्राणी विद्यमान नाही, ज्याने हे सर्व विश्व व्याप्त आहे, तो देश विजन म्हंटल्या जातो.

**कल्पना सर्वभूतानां ब्रह्मादीनां निमेषतः ।**
**कालशब्देन निर्दिष्टः ह्यखण्डानन्दमद्वयम् ॥ २४ ॥**

या उपनिषदात काल शब्दाचा अर्थ आहे तो ब्रह्म, ज्याच्या निमेषमात्राने

ब्रह्मा आदि सर्व भूतांची उत्पत्ती झाली आहे, तो अखंड, आनंदमय आणि अद्वितीय आहे.

**सुखेनैव भवेद्यस्मिन्नजस्रं ब्रह्मचिन्तनम् ।**
**आसनं तद्विजानीयादन्यत्सुखविनाशनम् ॥ २५ ॥**

आसन याचा अर्थ आहे की ज्या स्थितीत बसुन ब्रह्मतत्त्वाचे चिंतन केले जाते. त्याच्या विपरीत सर्व सुख नष्ट करणार्या क्रिया आसन म्हणता येत नाही.

**सिद्धये सर्वभूतादि विश्वाधिष्ठानमद्वयम् ।**
**यस्मिन्सिद्धिं गताः सिद्धास्तत्सिद्धासनमुच्यते ॥ २६ ॥**

समस्त भूतादि विश्वाचे अधिष्ठान भूत, अद्वय ब्रह्म प्राप्त करण्यासाठी ज्या आसनांच्या माध्यमातुन सिद्धजन सिद्धि प्राप्त करतात ते सिद्धासन म्हणतात.

**अङ्गानां समतां विद्यात्समे ब्रह्मणि लीयते ।**
**नो चेन्नैव समानत्वमृजुत्वं शुष्कवृक्षवत् ॥ २८ ॥**

जो सर्व लोकांचा मूल या आदि आहे, ज्याला आलंबन करुन चित्त एकाग्र केले आहे त्याला मूलबन्ध असे म्हणतात. ब्रह्मवादिंनी या मूलबन्धाची निरंतर साधना केली पाहिजे.

**दृष्टिं ज्ञानमयीं कृत्वा पश्येद्ब्रह्ममयं जगत्।**
**सा दृष्टिः परमोदारा न नासाग्रावलोकिनी ॥ २९ ॥**

समब्रह्मात लीन होण्याला अंगांची समता असे म्हणतात. जे लोक ऋजुता म्हणजे समता मानतात, ते योग्य नाही. ती समता तर शुष्क वृक्षासमान आहे.

**द्रष्टृदर्शनदृश्यानां विरामो यत्र वा भवेत्।**
**दृष्टिस्तत्रैव कर्तव्या न नासाग्रावलोकिनी ॥३०॥**

ज्या ज्ञानमयी दृष्टीद्वारे समस्त जगत् ब्रह्ममय दिसत आहे, त्याला परमोदारा दृष्टी असे म्हणतात. काही लोक नासिका च्या अग्रभागाकडे पाहण्यासच दृष्टी म्हणतात ते योग्य नाही. किंवा ज्या स्थितीत द्रष्टा (पाहणारा),दृश्य (विषय) आणि दर्शन पाहण्याचे साधन) विलय होते त्या अवस्थेला असे दृष्टी म्हणतात नासाग्र दृष्टीला दृष्टी मानून त्याची साधना कधी करु नये.

**चित्तादिसर्वभावेषु ब्रह्मत्वेनैव भावनात् ।**
**निरोधः सर्ववृत्तीनां प्राणायामः स उच्यते ॥ ३१॥**

प्राणायामाचा अर्थ आहे चित्त आदि सर्व भाव-पदार्थांत ब्रह्माची भावना आणि सर्व चित्ताच्या वृत्तींचा निरोध होणे.

**निषेधनं प्रपञ्चस्य रेचकाख्यः समीरितः।**
**ब्रह्मैवास्मीति या वृत्तिः पूरको वायुरुच्यते॥३२॥**

सर्व विश्व प्रपंच, असत्य आहे , ते सत् नाही अर्थात्  त्याचा निषेध करण्याला रेचक असे म्हणतात.  आणि मी ब्रह्म आहे, ही भावना पूरक म्हंटली जाते.

**ततस्तद्वृत्तिनैश्चल्यं कुम्भकः प्राणसंयमः ।**
**अयं चापि प्रबुद्धानामज्ञानां घ्राणपीडनम् ॥३३॥**

तदनन्तर या वृत्ती मध्ये म्हणजे मी ब्रह्म आहे या भावनेत स्थिरता कुम्भक प्राणायाम म्हंटल्या जातो. विवेकी जनच हा प्राणायाम मानतात. श्वासनिरोध या मूढवत् क्रियेला अज्ञानी लोक प्राणायाम म्हणतात. अर्थात् तो खऱ्या अर्थी प्राणायाम नाही.

**विषयेष्वात्मतां दृष्ट्वा मनसश्चित्तरञ्जकम्।**
**प्रत्याहारः स विज्ञेयोऽभ्यसनीयो मुहुर्मुहुः ॥ ३४॥**

इंद्रियांच्या सर्व विषयांमध्ये ब्रह्म ही भावना ठेऊन त्यात मनाची एकाग्रता

साधणे म्हणजे प्रत्याहार होय. याचा  निरंतर व अखंड अभ्यास केला पाहिजे

**यत्र यत्र मनो याति ब्रह्मणस्तत्र दर्शनात् ।**
**मनसा धारणं चैव धारणा सा परा मता ॥ ३५ ॥**

तदनन्तर या वृत्ती मध्ये म्हणजे मी ब्रह्म आहे या भावनेत स्थिरता कुम्भक प्राणायाम म्हंटल्या जातो. विवेकी जनच हा प्राणायाम मानतात. श्वासनिरोध या मूढवत् क्रियेला अज्ञानी लोक प्राणायाम म्हणतात. अर्थात् तो खऱ्या अर्थी प्राणायाम नाही.

मन जेथे जेथे धावेल तेथे तेथे त्या त्या स्थानी ब्रह्म तत्त्वाचे ध्यान करणे ही धारणा होय.

**ब्रह्मैवास्मीति सद्वृत्त्या निरालम्बतया स्थितिः ।**
**ध्यानशब्देन विख्यातः परमानन्ददायकः ॥३६॥**

मी स्वतःच  ब्रह्म आहे, या सद्वृत्तींच्या आलम्बनाशिवाय स्थिर ध्यान ठेवणे. यांत एक वेगळाच आनंद आहे.

**निर्विकारतया वृत्त्या ब्रह्माकारतया पुनः ।**
**वृत्तिविस्मरणं सम्यक्समाधिरभिधीयते ॥३७॥**

निर्विकार भावनेने ब्रह्ममय होऊंन समस्त वृत्तींचे विस्मरण करणे म्हणजे समाधी होय.

**इमं चाकृत्रिमानन्दं तावत्साधु समभ्यसेत् ।**
**लक्ष्यो यावत्क्षणात्पुंसः प्रत्यक्त्वं संभवेत्स्वयम् ॥ ३८ ॥**

या अभ्यासाचा,आनंदाचा सराव जोपर्यंत स्वतःची आत्मतत्त्वाच्या रुपात स्थिती होत नाही तोपर्यंत सराव करावा.

**ततः साधननिर्मुक्तः सिद्धो भवति योगिराट् ।**
**तत्स्वं रूपं भवेत्तस्य विषयो मनसो गिराम् ॥ ३९ ॥**

या साधनेनंतर योगीराज साधनेतून मुक्त होऊन परिपूर्ण होतात. योगींचे हे रूप मन आणि वाणीचा विषय असू शकत नाही.ते स्वरुप त्याच्या पलीकडले आहे.

**समाधौ क्रियमाणे तु विघ्नान्यायान्ति वै बलात् ।**
**अनुसंधानराहित्यमालस्यं भोगलालसम्॥४०॥**

**लयस्तमश्च विक्षेपस्तेजः स्वेदश्च शून्यता ।**
**एवं हि विघ्नबाहुल्यं त्याज्यं ब्रह्मविशारदैः ॥ ४१ ॥**

समाधीची साधना करताना क्रमात खालील विघ्न बलपूर्वक उपस्थित होतात- (१) शोधराहित्य म्हणजे ब्रह्मभावसाधनेचा अभाव (२) आलस्य, (३) भोगाची लालसा (४) लय अर्थात् आत्मविस्मृति, (५) तम अर्थात् निन्दा वा अज्ञान, (६) विक्षेप, (७) तेजस्वितेचा अनुभव होणे (८) स्वेद, (९) चित्तशून्यत्त्व होणे. अशाप्रकारे अनेक विघ्ने येतात आहेत. ब्रह्मविद्येच्या साधकांना या विघ्नांपासुन स्वत:चा बचाव करायला हवा.

**भाववृत्त्या हि भावत्वं शून्यवृत्त्या हि शून्यता।**
**ब्रह्मवृत्त्या हि पूर्णत्वं तया पूर्णत्वमभ्यसेत् ॥ ४२ ॥**

भाववृत्तीने भावत्वाची प्राप्ती होते आणि शून्यवृत्ति म्हणजे चित्तांत भावांचा अभाव करुन शून्यत्त्वाची प्राप्ती होती. ब्रह्मवृत्तीने से पूर्णता प्राप्त होते. अत: साधकाने त्याला पूर्णता प्राप्त करण्यासाठी ब्रह्मभावाचाच सम्यक् अभ्यास करावा

**ये हि वृत्तिं विहायैनां ब्रह्माख्यां पावनीं पराम् ।**
**वृथैव ते तु जीवन्ति पशुभिश्च समाः नराः ॥४३॥**

जो साधक या सर्वोत्कृष्ट आणि पावन ब्रह्मवृत्तीला सोडून अन्य साधना करतात, त्यांचे जीवन व्यर्थ आहे, ते मनुष्य पशुवतच आहेत.

**ये तु वृत्तिं विजानन्ति ज्ञात्वा वै वर्धयन्ति ये ।**
**ते वै सत्पुरुषा धन्याः वन्द्यास्ते भुवनत्रये ॥४४॥**

जे लोक या ब्रह्मवृत्तीला जाणुन त्याचेच सर्वथा प्रतिपादन करतात म्हणजे त्याचीच साधना करतात, ते सत्पुरुष धन्य आहे आणि त्रिलोकांमध्ये वंदनीय आहे.

**येषां वृत्तिः समा वृद्धा परिपक्वा च सा पुनः ।**
**ते वै सद्ब्रह्मतां प्राप्ता नेतरे शब्दवादिनः ॥ ४५ ॥**

ज्याची ब्रह्मवृत्ति सम झाली आहे , वृद्धिंगत झाली आहे आणि परिपक्व आहे, ते निश्चितपणे ब्रह्माची प्राप्ती करतात. अन्य लोक जे ब्रह्मची केवळ चर्चा करतात, ते फक्त शब्दवादी आहेत ब्रह्मवादी नाहीत.

**कुशला ब्रह्मवार्तायां वृत्तिहीनाः सुरागिणः ।**
**तेऽप्यज्ञानतया नूनं पुनरायान्ति यान्ति च ॥४६॥**

जे ब्रह्मवार्तेत पारंगत आहेत, साधना हीन नाहीत , परंतु ब्रह्मतत्त्वावर त्याची अपार आस्था आहे, ते देखील अज्ञानामुळे या जगात वारंवार येतात, म्हणजेच जन्म- मृत्यूच्या बंधनातून मुक्त होऊ शकत नाहीत.

**निमेषार्धं न तिष्ठन्ति वृत्तिं ब्रह्ममयीं विना।**
**यथा तिष्ठन्ति ब्रह्मज्ञाः सनकाद्याः शुकादयः ॥४७॥**

ज्याप्रमाणे सनकादि आणि शुक इत्यादि ब्रह्मज्ञानी ब्रह्मभावातच स्थित राहतात, एक निमेष देखील ब्रह्ममयी वृत्तिशिवाय राहत नाही, ते खरे योगी व ब्रह्मज्ञानी आहे.

**कारणं यस्य वै कार्यं कारणं तस्य जायते।**
**कारणं तत्त्वतो नश्येत्कार्याभावे विचारतः ॥४८॥**

ब्रह्म हे सर्वांचे कारण आहे, हा बोध त्याच्याच मनात होतो . ज्याच्या मनात कार्याची सत्ता विद्यमान आहे., कार्यभावाचा विचार नष्ट होताच कारणभावाचा विचारही आपसुकच गळुन पडतो.

**अथ शुद्धं भवेद्वस्तु यद्वै वाचामगोचरम्।**
**उदेति शुद्धचित्तानां वृत्तिज्ञानं ततः परम् ॥ ४९ ॥**

या अवस्थेत शुद्ध वस्तू म्हणजेच ब्रह्माचा मनात उदय होतो जो वाणीचा विषय नाही.ब्रह्मवृत्तीचे हे ज्ञान केवळ शुद्ध मनाच्या मनुष्यांनाच प्राप्त होते.

**भावितं तीव्रवेगेन यद्वस्तु निश्चयात्मकम्।**
**दृश्यं ह्यदृश्यतां नीत्वा ब्रह्माकारेण चिन्तयेत्॥५०॥**

**विद्वान्नित्यं सुखे तिष्ठेद्धिया चिद्रसपूर्णया॥**

संपूर्ण दृश्य जग अदृश्य करून, म्हणजेच तिचे खरे अस्तित्व नाही, ही भावना मनात स्थिर करून, ज्याने निश्चित ब्रह्म वस्तूची तीव्र गतीने अनुभूती केली आहे, त्याने या वस्तूचा सतत विचार करावा. ब्रह्मा. या चैतन्याने, विद्वान् पूर्ण बुद्धी झाल्यावर आनंदाच्या अवस्थेत चिरंतन उपस्थित होतो.

**इति तेजोबिन्दूपनिषत्सु प्रथमोऽध्यायः ॥**

## ॥ अथ द्वितीयोऽध्यायः ॥

\

**अथ ह कुमारः शिवं पप्रच्छाऽखण्डैकरसचिन्मात्रस्व-**
**रूपमनुब्रूहीति । स होवाच परमः शिवः ।**

**अखण्डैकरसं दृश्यमखण्डैकरसं जगत् ।**
**अखण्डैकरसं भावमखण्डैकरसं स्वयम् ॥ १ ॥**

1)या अध्यायात शिवपुत्र षडानन म्हणजेच कार्तिकेय आपल्या पित्याकडून अखंड एकरस चिन्मात्र स्वरुप जाणून घेण्याबाबत जिज्ञासा प्रकट करतात आणि उपदेश करावा अशी विनंती करतात. त्यावर परमशिव सांगतात.हा सगळा दृश्य स्वरूपातील विश्वाचा प्रपंच अखंड एकरस आहे. अर्थात् हे सर्व जगत अखंड एकरस आहे. त्यातील भाव आणि स्वत: आत्मतत्व हे देखील अखंड एकरस असल्याचे सांगितले आहे

**अखण्डैकरसो मन्त्र अखण्डैकरसा क्रिया ।**
**अखण्डैकरसं ज्ञानमखण्डैकरसं जलम् ॥ २॥**

पुढे जाऊन परमशिव अखंड एकरस काय काय आहेत ते सांगताना म्हणतात...मंत्र ,क्रिया, ज्ञान आणि जल हे अखंड एकरस आहेत.

**अखण्डैकरसा भूमिरखण्डैकरसं वियत् ।**
**अखण्डैकरसं शास्त्रमखण्डैकरसा त्रयी ॥३॥**

तिस-या श्लोकात भूमी अखंड एकरस आहे, आकाश अखंड एकरस आहे, शास्त्र अखंड एकरस आहे आणि तिन्ही विद्या अर्थात् वेद अखंड एकरस असल्याचे सांगितले आहे.

**अखण्डैकरसं ब्रह्म चाखण्डैकरसं व्रतम् ।**
**अखण्डैकरसो जीव अखण्डैकरसो ह्यजः ॥ ४॥**

ब्रम्ह म्हणजेच हे अवघे चराचर एकरस आहे , जीव, व्रत आणि अज हे देखील अखंड एकरसाचेच उदाहरण आहे.

**अखण्डैकरसो ब्रह्म अखण्डैकरसो हरिः ।**
**अखण्डैकरसो रुद्र अखण्डैकरसोऽस्म्यहम्॥५॥**

सृष्टीची उत्पत्ती करणारे ब्रम्हा, पालनकर्ते श्री विष्णू म्हणजेच हर आणि मी स्वत: रूद्र (लय) अखंड एकरस असल्याचे शंभू महादेव आपल्या पुत्रास सांगत आहेत.

**अखण्डैकरसो ह्यात्मा हाखण्डैकरसो गुरुः ।**
**अखण्डैकरसं लक्ष्यमखण्डैकरसं महः ॥६॥**

अविनाशी आणि सर्वांतर्यामी आत्मा, स्वस्वरूपाची ओळख करून देणारे गुरू, लक्ष्य आणि त्रिलोकापैकी एक असे जे महिर्लोक अर्थात् पृथ्वी यांचा देखील अखंड एकरस म्हणून उल्लेख केलेला आहे.

**अखण्डैकरसो देहः अखण्डैकरसं मनः ।**
**अखण्डैकरसं चित्तमखण्डैकरसं सुखम् ॥७॥**

देह अखंड एकरस आहे, मन अखंड एकरस आहे, चित्त अखंड एकरस आहे आणि सुखाचा अंतर्भाव सिद्धि एकरसातच होतो, हे या श्लोकात सांगितले आहे.

**अखण्डैकरसा विद्या अखण्डैकरसोऽव्ययः ।**
**अखण्डैकरसं नित्यमखण्डैकरसं परम् ॥ ८॥**

विद्या, अव्यय म्हणजेच अपरिवर्तनीय तत्त्व अखंड एकरस आहेत. नित्य तत्त्व आणि परतत्त्व अखंड एकरस चिन्मात्र स्वरूप आहे.

**अखण्डैकरसं किंचिदखण्डैकरसं परम् ।**
**अखण्डैकरसादन्यन्नास्ति नास्ति षडानन ॥ ९ ॥**

हे अवघे चराचर विश्व, या विश्वातला प्रत्येक अणूरेणू आणि परतत्त्व हे सगळं काही अखंड एकरसच आहे. 'याशिवाय वेगळं असं काहीच नाही, षडानना'! असे परमशिव षडाननाला या श्लोकात विस्तारपूर्वक सांगत आहेत.

**अखण्डैकरसान्नास्ति अखण्डैकरसान्न हि ।**
**अखण्डैकरसात्किंचिदखण्डैकरसादहम्॥१०॥**

अखंड एकरसाशिवाय वेगळं असं काहीच नाही. जे जे काही भरून उरलेलं आहे ते सगळं अखंड एकरस आहे. प्रकट स्वरूपातील अखंड एकरसातूनच प्रकट झालेले आहे. माझे प्राकट्यरूप हे देखील अखंड एकरसातूनच झाले असल्याचे शिव या श्लोकात सांगतात.

**अखण्डैकरसं स्थूलं सूक्ष्मं चाखण्डरूपकम् ।**
**अखण्डैकरसं वेद्यमखण्डैकरसो भवान् ॥ ११ ॥**

मानवी देहाचे जे स्थूल आणि सूक्ष्म देह प्रकार आहेत ते दोन्ही अखंड एकरसाचेच रूप आहे. जाणण्यायोग्य म्हणून जे काही आहेत, ते सारेच अखंड एकरस होत.

**अखण्डैकरसं गुह्यमखण्डैकरसादिकम् ।**
**अखण्डैकरसो ज्ञाता ह्यखण्डैकरसा स्थितिः ॥ १२ ॥**

गुह्य, अप्रकट विश्व किंवा रहस्य म्हणून जे काही आहेत, ते सारे अखंड एकरसच होय. ज्ञाता आणि स्थिती अखंड एकरसाचे उदाहरण होय.

**अखण्डैकरसा माता अखण्डैकरसः पिता।**
**अखण्डैकरसो भ्राता अखण्डैकरसः पतिः ॥ १३ ॥**

माता, पिता, भ्राता आणि भ्रतार यांचा देखील समावेश अखंड एकरसात केलेला आहे.

**अखण्डैकरसं सूत्रमखण्डैकरसो विराट्।**
**अखण्डैकरसं गात्रमखण्डैकरसं शिरः ॥ १४॥**

सूत्र, विराट, शरीर आणि शिर या सर्वांचा नामोल्लेख अखंड एकरसात आलेला आहे.

**अखण्डैकरसं चान्तरखण्डैकरसं बहिः ।**
**अखण्डैकरसं पूर्णमखण्डैकरसामृतम्॥15||**

आतील रस हा अखंड एकरस आहे. बाहेरील रस, एवढेच नव्हे तर, अमृतासह पूर्णच अखंड एकरस आहे.

**अखण्डैकरसं गोत्रमखण्डैकरसं गृहम्।**
**अखण्डैकरसं गोप्यमखण्डैकरसः शशी ॥ १६ ॥**

गौत्र, गृह, लपवण्यायोग्य जे काही आहेत, ते सारे अखंड एकरस म्हणविल्या जातात.

**अखण्डैकरसास्तारा अखण्डैकरसो रविः ।**
**अखण्डैकरसं क्षेत्रमखण्डैकरसा क्षमा॥१७॥**

आता अंतराळाचा विचार केला तर, तारांगण म्हणजे प्रत्येक तारका, रविराज अखंड एकरस आहेत. संपूर्ण क्षेत्र आणि क्षमा म्हणजे पृथ्वी यांना देखील अखंड एकरसानेच संबोधले आहे.

**अखण्डैकरसः शान्तः, अखण्डैकरसोऽगुणः ।**
**अखण्डैकरसः साक्षी अखण्डैकरसः सुहृत् ॥ १८ ॥**

शान्त अखंड एकरस आहे, निर्गुण अखंड एकरस आहे, साक्षी आणि मित्र

यांचा अखंड एकरस असल्याचा निर्वाळा परमशिव कार्तिकेयाला देत आहेत.

**अखण्डकरसो बन्धुरखण्डैकरसः सखा ।**
**अखण्डैकरसो राजा अखण्डैकरसं पुरम् ॥ १९ ॥**

बंधु, सखा राजा आणि पुर म्हणजे नगर यांना अखंड एकरस  म्हटले आहे.

**अखण्डैकरसं राज्यमखण्डैकरसाः प्रजाः ।**
**अखण्डैकरसं तारमखण्डैकरसो जपः ॥ २० ॥**

राजा अखंड एकरस आहे, प्रजा अखंड एकरस आहे,  तार म्हणजे एकतानता अखंड एकरस आहे आणि जल अखंड एकरस आहे.

**अखण्डैकरसं ध्यानमखण्डैकरसं पदम् ।**
**अखण्डैकरसं ग्राह्यमखण्डैकरसं महत् ॥ २१ ॥**

अखंड एकरस ध्यान आहे, अखंड एकरस पद म्हणजेच चरण किंवा स्थान आहे , जे जे काही ग्राह्य स्वरूपातील आहे अर्थात ग्रहण करण्यायोग्य आहे तेही अखंड एकरस आहे. असा हा  सर्वरूपी अखंड एकरस महान असणारच, असा उपदेश भगवान शिव या श्लोकातून आपल्या पुत्रास करीत आहेत.

**अखण्डैकरसं ज्योतिरखण्डैकरसं धनम्।**
**अखण्डैकरसं भोज्यमखण्डैकरसं हविः ॥ २२ ॥**

अखंड एकरस ज्योति आहे,  अखंड एकरस धन (संपत्ती) आहे.  भोजन आणि हवि म्हणजेच यज्ञास लागणारी सामग्री, यांना देखील अखंड एकरस असे संबोधले आहे.

**अखण्डैकरसो होम अखण्डैकरसोः जपः ।**
**अखण्डैकरसं स्वर्गमखण्डैकरसः स्वयम् ॥ २३ ॥**

होम हवन, जप, स्वर्ग आणि स्वत:  रूद्र अखंड एकरस आहेत.

**अखण्डैकरसं सर्वं चिन्मात्रमिति भावयेत् ।**
**चिन्मात्रमेव चिन्मात्रमखण्डैकरसं परम् ॥ २४ ॥**

अशाप्रकारे वरील 23 श्लोकापर्यंत  हे  सर्व जगत् आणि या  जगतातील उपरोक्त उल्लेखित सर्व काही अखंड एकरस आहेत आणि हेच सारे चिन्मात्र आहे अशी भावना मनात जागृत ठेवायला पाहिजे. अखंड एकरस असलेले हे परम चिन्मात्र हेच चिन्मात्र आहे, हे लक्षात घेतले पाहिजे

**भववर्जितचिन्मात्रं सर्वं चिन्मात्रमेव हि ।**
**किं च सर्वं चिन्मात्रमयं चिन्मयमेव हि ॥ २५ ॥**

संसाररहित हे चिन्मात्र आहे तरीही सगळं काही चिन्मात्र असल्याचे या श्लोकात सांगितले आहे. याचाच अर्थ हा की चिन्मात्रा शिवाय दुसरे काहीच नाही. प्रत्यक्षात शिव हेही चिन्मात्र  स्वरूपच आहे.

**आत्मभावं च चिन्मात्रमखण्डैकरसं विदुः ।**
**सर्वलोकं च चिन्मात्रं त्वत्ता मत्ता च चिन्मयम् ॥ २६ ॥**

आत्मभाव हा अखंड एकरस आणि चिन्मात्र समजला जातो.  समस्त  लोक चिन्मात्र तसेच परभाव आणि अहंभाव हा देखील   चिन्मात्र, चिन्मय समजला जातो.

**आकाशो भूर्जलं वायुरग्निर्ब्रह्मा: हरिः शिवः ।**
**यत्किंचिद्यन्नं किंचिच्च सर्वं चिन्मात्रमेव हि ॥ २७ ॥**

आकाश, भूमी, जल, वायु,  अग्नी, ब्रम्हा, हरी, शिव असे जे जे काही अस्तित्वात आहे आणि ज्यांचे अस्तित्व नाही असे सारे काही चिन्मात्र असल्याचे या श्लोकात सांगितले आहे.

**अखण्डैकरसं सर्वं यद्यच्चिन्मात्रमेव हि ।**
**भूतं भव्यं भविष्यच्च सर्वं चिन्मात्रमेव हि ॥ २८ ॥**

सर्व अखंड एकरस चिन्मात्र च आहे,जे काही आहे ते यच्चयावत् अखंड एकरस रूप आहे, तो चिन्मात्रच आहे, तो भूत(होऊन गेलेला),भव्य (होण्यायोग्य),भविष्य(होणारा) चिन्मात्र ,अखंड एकरस आहे.

**द्रव्यं कालं च चिन्मात्रं ज्ञानं ज्ञेयं चिदेव हि ।**
**ज्ञाता चिन्मात्ररूपश्च सर्वं चिन्मयमेव हि ॥ २९ ॥**

द्रव्य आणि काळ, ज्ञान आणि ज्ञेय, ज्ञाता हे सारे चिन्मात्र स्वरुप आहे. याचाच अर्थ हा की सर्व काही चिन्मय आणि चेतन स्वरूप आहे.

**संभाषणं च चिन्मात्रं यद्यच्चिन्मात्रमेव हि ।**
**असच्च सच्च चिन्मात्रमाद्यन्तं चिन्मयं सदा ॥ ३० ॥**

संभाषण म्हणजेच बोलणे चिन्मात्र स्वरूप आहे. थोडक्यात, जे जे काही आहे ते चिन्मात्रच आहे. सत्य-असत्य, आदि-अंत यांचा देखील चिन्मात्र स्वरूपातच समावेश होतो.

**आदिरन्तश्च चिन्मात्रं गुरुशिष्यादि चिन्मयम् ।**
**दृग्दृश्यं यदि चिन्मात्रमस्ति चेच्चिन्मयं सदा ॥३१॥**

या श्लोकात चिन्मात्र आणि चिन्मय काय आहेत, हे सांगताना प्रभू शिव म्हणतात, आदि-अंत, गुरू-शिष्य हे चिन्मात्र आणि चिन्मय आहे. द्रष्टा आणि दृश्य चिन्मात्र असल्यामुळे सारेच काही चिन्मात्र -चिन्मय आहे.

**सर्वाशर्यं हि चिन्मात्रं देहं चिन्मात्रमेव हि ।**
**लिङ्गं च कारणं चैव चिन्मात्रान्त्र हि भिद्यते ॥३२॥**

सर्वांचा आश्रय ते एकमेव चिन्मात्र तत्त्व आहे, लिंग देह अर्थात् सूक्ष्म शरीर वा कारण देहसुद्धा चिन्मात्रच आहे.

**अहं त्वं चैव चिन्मात्रं मूर्तामूर्तादिचिन्मयम् ।**
**पुण्यं पापं च चिन्मात्रं जीवश्चिन्मात्रविग्रहः ॥ ३३ ॥**

या श्लोकात अधिक सविस्तर सांगताना परमशिव म्हणतात....तू ,मी, मूर्त, अमूर्त हे चिन्मात्र असून पाप -पुण्य आणि प्रत्येक जीवाचे स्वरूप हे चिन्मात्र होय.

**चिन्मात्रान्नास्ति संकल्पश्चिन्मात्रान्नास्ति वेदनम् ।**
**चिन्मात्रान्नास्ति मन्त्रादि चिन्मात्रान्नास्ति देवता ॥ ३४ ॥**

चिन्मात्राशिवाय संकल्प नाही, अनुभूती ही चिन्मात्रापेक्षा वेगळी नाही, चिन्मात्रशिवाय मंत्र तंत्रादी नाही आणि चिन्मात्राशिवाय देवताही नाहींत.

**चिन्मात्रान्नास्ति दिक्पालश्चिन्मात्राद्व्यावहारिकम् ।**
**चिन्मात्रात्परमं ब्रह्म चिन्मात्रान्नास्ति कोऽपि हि ॥ ३५ ॥**

दिक्पाल हे चिन्मात्राहून वेगळे नाही, व्यावहारिक जगत् हे सुद्धा चिन्मात्राहून भिन्न नाही. परब्रम्ह हे चिन्मात्रच आहे. चिन्मात्राशिवाय वेगळे असे काहीच नाही.

**चिन्मात्रान्नास्ति माया च चिन्मात्रान्नास्ति पूजनम् ।**
**चिन्मात्रान्नास्ति मन्तव्यं चिन्मात्रान्नास्ति सत्यकम् ॥३६॥**

चिन्मात्राशिवाय माया नाही, चिन्मात्राशिवाय पूजन नाही, चिन्मात्राशिवाय मानण्यायोग्य काहीच नाही, इतकेच काय तर, चिन्मात्राशिवाय सत्यताही नाही.

**चिन्मात्रान्नास्ति कोशादि चिन्मात्रान्नास्ति वै**
**चिन्मात्रान्नास्ति मौनं च चिन्मात्रान्नास्त्यमौनकम् ॥ ३७॥**

चिन्मात्राशिवाय खजिना नाही, वसु (धन) नाही, मौन नाही आणि विशेष म्हणजे अमौनही नाही.

**चिन्मात्रान्नास्ति वैराग्यं सर्वं चिन्मात्रमेव हि ।**
**यच्च यावच्च चिन्मात्रं यच्च यावच्च दृश्यते ॥ ३८ ॥**

वैराग्य हे  चिन्मात्रापेक्षा वेगळे नाही. , सगळं सगळं म्हणून जे काही आहे ते आणि दृश्य स्वरूपातील प्रत्येकच चिन्मात्र स्वरूप आहे.

**यच्चयावच्च दूरस्थं सर्वं चिन्मात्रमेव हि ।**
**यच यावच्च भूतादि यच यावच्च लक्ष्यते ॥ ३९ ॥**

कोट्यावधी अंतरावर स्थित असलेले, भूतरूपातील आणि प्रतीत होणा-या प्रत्येक गोष्टी चिन्मात्र स्वरुप आहे.

**यच्च यावच्च वेदान्ताः सर्वं चिन्मात्रमेव हि ।**
**चिन्मात्रान्नास्ति गमनं चिन्मात्रान्नास्ति मोक्षकम् ॥ ४० ॥**

**जि**तके वेदांत शास्त्रे आहेत, ते चिन्मात्र मानल्या गेले आहेत. चिन्मात्राशिवाय जाणे नाही-गमन नाही. मोक्ष देखील चिन्मात्र स्वरूपच आहे.

**चिन्मात्रान्नास्ति लक्ष्यं च सर्वं चिन्मात्रेव हि ।**
**अखण्डैकरसं ब्रह्म चिन्मात्रान्त्र हि भिद्यते ॥ ४१ ॥**

चिन्मात्राशिवाय लक्ष्य नाही, सगळच चिन्मात्र असल्याचा शिव उपदेश करीत आहेत. अखंड एकरस असलेले ब्रम्ह चिन्मात्राहून भिन्न नाही.

**शास्त्रे मयि त्वयीशे च ह्यखण्डैकरसो भवान् ।**
**इत्येकरूपकतया यो वा जानात्यहं त्विति ॥ ४२ ॥**

**सकृत्ज्ञानेन मुक्तिः स्यात्सम्यग्ज्ञाने स्वयं गुरुः ॥ ४३ ॥**

या अध्यायाच्या समारोपाच्या म्हणजेच शेवटच्या श्लोकात असे सांगितले आहे की, शास्त्रात, माझ्या -तुझ्यात ,ईश्वरात सर्वत्र अखंड एकरस तुम्ही

स्वत: आहात. हे एकदा का जाणले की तो जाणणारा मोक्षपदास निश्चितच प्राप्त होणार! हे सम्यक ज्ञान ज्यास झाले तो गुरूपदी नक्कीच आरूढ झाला असे समजावे.

**इति तेजोबिन्दूपनिषत्सु द्वितीयोऽध्यायः ॥**

## ॥ अथ तृतीयोऽध्यायः ॥

**कुमारः पितरमात्मानुभवमनुब्रूहीति पप्रच्छ।**
**स होवाच परः शिवः ।**

**परब्रह्मस्वरूपोऽहं परमानन्दमस्म्यहम् ।**
**केवलं ज्ञानरूपोऽहं केवलं परमोऽस्म्यहम् ॥ १॥**

कुमार कार्तिकेयाने त्याचे पिता शिवशंकर यांना प्रश्न विचारला की आत्माविषयक तत्त्वज्ञानाचा मला उपदेश करा.त्यावर भगवान परमशिव उत्तरले –मी परब्रह्म स्वरूप आहे.मी परमानंद स्वरूप आहे,केवळ ज्ञानरूप आहे आणि केवळ परम म्हणजेच श्रेष्ठरुपात आहे.

**केवलं शान्तरूपोऽहं केवलं चिन्मयोऽस्म्यहम् ।**
**केवलं नित्यरूपोऽहं केवलं शाश्वतोऽस्म्यहम् ॥ २ ॥**

मी केवळ शांतीरूप आहे, केवळ चिन्मय अर्थात् चित्स्वरुप आहे, मी केवळ नित्यस्वरूप आहे, (तसेच) शाश्वत ,नित्य स्वरूप आहे.

**केवलं सत्त्वरूपोऽहमहं त्यक्त्वाहमस्म्यहम् ।**
**सर्वहीनस्वरूपोऽहं चिदाकाशमयोऽस्म्यहम् ॥ ३॥**

मी केवळ सत्त्वस्वरूप आहे (अर्थात् त्यात सत्त्व गुण अतिशय रुपात असतो), अहम्भावारहित आहे.मी जे प्रतिमान  विषय आहे त्या सर्वंपासून भिन्न आहे.अर्थात् केवळ प्रतीती रूप आहे, भ्रमरूप आहे, मी चिदाकाशस्वरूप आहे.

**केवलं तुर्यरूपोऽस्मि तुर्यातीतोऽस्मि केवलः ।**
**सदा चैतन्यरूपोऽस्मि चिदानन्दमयोऽस्म्यहम् ॥ ४॥**

मी तुरीय अर्थात् समाधी रूप आहे.मी सर्वदा चैतन्य रूप आहे, चिदानंद स्वरूप आहे.

**केवलाकाररूपोऽस्मि शुद्धरूपोऽस्म्यहं सदा ।**
**केवलं ज्ञानरूपोऽस्मि केवलं प्रियमस्म्यहम् ॥ ५ ॥**

मी केवळ आकार स्वरूप आहे,सदा शुद्धरूप आहे मी केवळ ज्ञानरूप आहे,आणि केवळ प्रिय आहे.

**निर्विकल्पस्वरूपोऽस्मि निरीहोऽस्मि निरामयः ।**
**सदाऽसङ्गस्वरूपोऽस्मि निर्विकारोऽहमव्ययः ॥६॥**

मी अद्वितीय असल्याने माझ्यासारखा दुसरा नाहीच, म्हणूनच विकल्परहित आहे,तसेच इच्छारहित व निर्दोष (ज्याचा पासून दोष निघून गेला आहे असा) आहे.मी सदा असंग स्वरूप आहे निर्विकार व अव्यय (अविनाशी)

आहे.

**सदैकरसरूपोऽस्मि सदा चिन्मात्रविग्रहः ।**
**अपरिच्छिन्नरूपोऽस्मि ह्यखण्डानन्दरूपवान् ॥ ७॥**

मी सदा एकरसरुप आहे, सदा चिन्मात्र स्वरूप आहे.तसेच अखंड आनंदस्वरूपवान् आहे , आणि अपरीच्छीन्न रूप आहे.

**सत्परानन्दरूपोऽस्मि चित्परानन्दमस्म्यहम्।**
**अन्तरान्तररूपोऽहमवाङ्मनसगोचरः॥८॥**

मी सत् आणि अतिशय आनंदस्वरूप आहे.आत्माराम स्वरूप आहे, आणि मी सदाशिव आत्मा आहे.

**आत्मानन्दस्वरूपोऽहं सत्यानन्दोऽस्म्यहं सदा ।**
**आत्मारामस्वरूपोऽस्मि ह्यहमात्मा सदाशिवः ॥ ९ ॥**

मी आत्मनंदस्वरूप आहे, सत्य आनंदस्वरूप आहे,आत्मारामस्वरूप आहे,आणि मी सदाशिव आत्मा आहे.

**आत्मप्रकाशरूपोऽस्मि ह्यात्मज्योती रसोऽस्म्यहम् ।**
**आदिमध्यान्तहीनोऽस्मि ह्याकाशसदृशोऽस्म्यहम् ॥ १० ॥**

मी आत्मप्रकाशरूप आहे, आत्मज्योतीरस स्वरूप आहे, आदि , मध्य व अंत रहित आहे, आणि मी आकाश स्वरूप आहे.

**नित्यशुद्धचिदानन्दसत्तामात्रोऽहमव्ययः ।**
**नित्यबुद्धविशुद्धैकसच्चिदानन्दमस्म्यहम्॥११॥**

मी नित्य, शुद्ध, चिदानंद सत्तामात्र ,निर्विकार आहे.मी नित्यबुद्ध, विशुद्ध,एकमात्र सत् चित् आनंदस्वरूप आहे.

**नित्यशेषस्वरूपोऽस्मि सर्वातीतोऽस्म्यहं सदा ।**
**रूपातीतस्वरूपोऽस्मि परमाकाशविग्रहः ॥ १२॥**

मी नित्यशेष स्वरूप आहे, सर्वांच्या अतीत आहे, रूपातीत आहे,आणि परम आकाश स्वरूप आहे.

**भूमानन्दस्वरूपोऽस्मि भाषाहीनोऽस्म्यहं सदा ।**
**सर्वाधिष्ठानरूपोऽस्मि सर्वदा चिद्घनोऽस्म्यहम् ॥ १३ ॥**

मी अतिशय आनंदस्वरूप आहे. मी सदैव भाषारहित, भाषाहीन असून सर्वांचे आधाररूप असे माझे स्वरूप आहे. असा मी नित्य चैतन्यघन आहे.

**देहभावविहीनोऽस्मि चिन्ताहीनोऽस्मि सर्वदा।**
**चित्तवृत्तिविहीनोऽहं चिदात्मैकरसोऽस्म्यहम् ॥ १४ ॥**

मी सदैव देहभावरहित, चिंतारहित, चित्तवृत्तीरहित असा एकरस चिदात्मस्वरूप आहे.

**सर्वदृश्यविहीनोऽहं दृग्रूपोऽस्म्यहमेव हि ।**
**सर्वदा पूर्णरूपोऽस्मि नित्यतृप्तोऽस्म्यहं सदा ॥ १५ ॥**

माझ्यात कोणत्याही प्रकारचा दृश्यभाव नाही.मी द्रष्टारूपच आहे, मी सदैव पूर्णरूप आहे आणि नित्य तृप्त स्वरूप आहे.

**अहं ब्रह्मैव सर्व स्यादहं चैतन्यमेव हि ।**
**अहमेवाहमेवास्मि भूमाकाशस्वरूपवान् ॥ १६॥**

' अहं ब्रम्हास्मि ' असे या श्लोकात शिव सांगतात. म्हणजे मीच ब्रम्ह आहे, मीच चैतन्य आणि मीच आकाश स्वरूप आहे.

**अहमेव महानात्मा ह्यहमेव परात्परः ।**
**अहमन्यवदाभामि ह्यहमेव शरीरवत् ॥ १७||**

मीच महान आत्मा आहो, मीच सर्वश्रेष्ठ ब्रम्ह आहे , मीच अन्य इतरांसारखा भासमान असून शरीरासारखाही मीच आहे.

**अहं शिष्यवदाभामि ह्ययं लोकत्रयाश्रयः ।**
**अहं कालत्रयातीत अहं वेदैरुपासितः ॥ १८ ॥**

मी शिष्य रूपात प्रतीत होतो, तर त्रिलोकांचा आधार आहे ,आश्रय आहे . मी त्रिकालातीत असून विशेष म्हणजे वेद देखील माझीच उपासना करतात.

**अहं शास्त्रेण निर्णीत अहं चित्ते व्यवस्थितः ।**
**मत्त्यक्तं नास्ति किंचिद्वा मत्त्यक्तं पृथिवी च वा ॥ १९ ॥**

शास्त्राद्वारेच माझे चयन झाले आहे, निर्णय झाला आहे.. मी प्रत्येकाच्या चित्तात स्थित असून माझ्याविना अन्य काहीच नाही, हे लक्षात ठेव. इतकच काय काय तर पृथ्वी देखील माझ्यातूनच प्रकट झाली आहे. याचाच अर्थ माझ्या शिवाय पृथ्वीचेही अस्तित्व नाही.

**मयातिरिक्तं यद्यद्वा तत्तन्नास्तीति निश्चिनु ।**
**अहं ब्रह्मास्मि सिद्धोऽस्मि नित्यशुद्धोऽस्म्यहं सदा ।। २०।।**

वरील श्लोकाचा आधार घेऊन शिव म्हणतात, माझ्याविना जे जे काही दिसत असेल तर ते यथार्थ नाही, असे ठामपणे समजावे. मी सिद्ध आणि नित्य शुद्ध असे परब्रम्ह आहो.

**अहं शास्त्रेण निर्णीत अहं चित्ते व्यवस्थितः ।**
**मत्त्यक्तं नास्ति किंचिद्वा मत्त्यक्तं पृथिवी च वा ॥ १९ ॥**

शास्त्राद्वारेच माझे चयन झाले आहे, निर्णय झाला आहे.. मी प्रत्येकाच्या चित्तात स्थित असून माझ्याविना अन्य काहीच नाही, हे लक्षात ठेव. इतकच काय काय तर पृथ्वी देखील माझ्यातूनच प्रकट झाली आहे. याचाच अर्थ माझ्या शिवाय पृथ्वीचेही अस्तित्व नाही.

**अहं शास्त्रेण निर्णीत अहं चित्ते व्यवस्थितः ।**
**मत्त्यक्तं नास्ति किंचिद्वा मत्त्यक्तं पृथिवी च वा ॥ १९ ॥**

शास्त्राद्वारेच माझे चयन झाले आहे, निर्णय झाला आहे.. मी प्रत्येकाच्या चित्तात स्थित असून माझ्याविना अन्य काहीच नाही, हे लक्षात ठेव. इतकच काय काय तर पृथ्वी देखील माझ्यातूनच प्रकट झाली आहे. याचाच अर्थ माझ्या शिवाय पृथ्वीचेही अस्तित्व नाही.

**निर्गुणः केवलात्मास्मि निराकारोऽस्म्यहं सदा ।**
**केवलं ब्रह्ममात्रोऽस्मि ह्यजरोऽस्म्यमरोऽस्म्यहम् ॥ २१ ॥**

माझे रूप हे केवळ निर्गुण आणि आत्मस्वरूप आहे. आकाररहीत अर्थात निराकार असे माझे वर्णन केल्या जाते. मी ब्रम्हमात्र असून अजर आणि अमर असेच माझे अस्तित्व जाणावे.

**स्वयमेव स्वयं भामि स्वयमेव सदात्मकः ।**
**स्वयमेवात्मनि स्वस्थ: स्वयमेव परा गतिः ॥ २२ ॥**

या श्लोकात भगवान शिव स्वत:बद्दल सांगताना म्हणतात, माझे स्वत:चेच रूप माझ्यातच प्रतिभासात्मक असे आहे. मी स्वत:च स्वरूपात्मक असून आत्मभावात सदैव स्थित राहतो. परमगती जी म्हणतात ते सुध्दा माझेच स्वरूप समज.

**स्वयमेव स्वयं भुञ्जे स्वयमेव स्वयं रमे ।**
**स्वयमेव स्वयं ज्योतिः स्वयमेव स्वयं महः ॥ २३ ॥**

मी स्वत:च तेजाचे स्वरूप असल्यामुळे प्रकाशित होणारे तेज हे माझेच स्वरूप आहे. मी स्वत:तच भोगविलासात रममाण होत असतो. हीच माझ्या स्वरूपाची अनुभूति आहे.

**स्वस्यात्मनि स्वयं स्वात्मन्येव विलोकये।**
**स्वात्मन्येव सुखासीनः स्वात्ममात्रावशेषकः ॥ २४ ॥**

माझे हे आत्मरूप असून, असा मी माझ्या आत्मस्वरूपातच रममाण झालेला असतो. आत्म्यातच मी सारे काही पाहातो आणि आत्म्यातच मी सुखपूर्वक विराजमान झालो आहे. असा हा माझा वास आत्म्यातच असतो, हे लक्षात घे.

**स्वचैतन्ये स्वयं स्थास्ये स्वात्मराज्ये सुखे रमे ।**
**स्वात्मसिंहासने स्थित्वा स्वात्मनोऽन्यन्न चिन्तये ॥ २५ ॥**

पुढे भगवान शिव कार्तिकेयाला आपला अनुभव सांगताना म्हणतात, मी स्वत: सदैव निजचैतन्यात स्थिर आहो. स्वराज्यात म्हणजेच माझ्या आत्मराज्यात मी सुखनैव निवास करतो. या राज्यातील आत्मसिंहासनावर स्थित होऊन आत्म्याव्यतिरिक्त इतर कोणत्याही विषयावर मी विचार करीत नाही.

**चिद्रूपमात्रं ब्रह्मैव सच्चिदान्दमद्वयम् ।**
**आनन्दघन एवाहमहं ब्रह्मास्मि केवलम् ॥ २६ ॥**

मी ब्रम्हरूप असून चिद्रूपमात्र असे माझे स्वरूप आहे. अनन्यसाधारण आनंद देणारे सत्-चित-आनंद स्वरूप मी आहे. मी आनंदघन स्वरूप असून माझे रूप ब्रम्हरूप समज.

**सर्वदा सर्वशून्योऽहं सर्वात्मानन्दवाहनम् ।**
**नित्यानन्दस्वरूपोऽहमात्माकाशोऽस्मि नित्यदा ॥ २७ ॥**

मी सर्वदा सगळ्यात असून नसल्यासारखा असतो, अर्थात् सर्वदा सर्व शून्य असे माझे स्वरूप आहे. सर्व आत्म्यातील आनंदस्वरूप हे माझेच आहे. नित्यानंदस्वरूप आणि नित्य आत्मारूपात मी स्थित असतो .

**अहमेव हृदाकाशश्चिदादित्यस्वरूपवान् ।**
**आत्मनात्मनि तृप्तोऽस्मि ह्यरूपोऽस्म्यहमव्ययः ॥ २८ ॥**

आकाश ज्याप्रमाणे सर्वव्यापी आहे, त्याचप्रमाणे प्रत्येक हृदयात मी व्यापूनही उरलेला आहो. माझे चित्त आदित्यस्वरूप म्हणजे तेजोमय आहे. मी स्वत: तृप्त आहे, रूपहीन आणि अपरिवर्तनीय आहे.

**एकसंख्याविहीनोऽस्मि नित्यमुक्तस्वरूपवान् ।**
**आकाशादपि सूक्ष्मोऽहमाद्यन्ताभाववानहम् ॥ २९ ॥**

माझे स्वरूप हे नित्यमुक्त आहे. संख्याविरहीत आहे. आकाशाहून सूक्ष्म आणि माझ्यात आदी-अंत नसलेले हे स्वरूप आहे .

**सर्वप्रकाशरूपोऽहं परावरसुखोऽस्म्यहम्।**
**सत्तामात्रस्वरूपोऽहं शुद्धमोक्षस्वरूपवान् ॥३०॥**

अखिल विश्वात पसरलेला हा तेजोमय प्रकाश माझेच स्वरूप आहे .मी श्रेष्ठात श्रेष्ठ व सामान्यात सामान्य सुखस्वरूपात आहे. सत्तामात्र हे तर माझे

स्वरूप आहेच पण शुध्द मोक्ष हे माझे खरे स्वरूप जाणावे.

**सत्यानन्दस्वरूपोऽहं ज्ञानानन्दघनोऽस्म्यहम्।**
**विज्ञानमात्ररूपोऽहं सच्चिदानन्दलक्षणः ॥३१॥**

मी शुद्ध आनंद म्हणजेच सत्य आनंदाचे स्वरूप आहे. ज्ञानानंद असे घनरूप म्हणजे माझे स्वरूप आहे. अशाप्रकारे माझ्या स्वरूपाचे लक्षण म्हणजे सत्-चित-आनंद आहे.

**ब्रह्ममात्रमिदं सर्वं ब्रह्मणोऽन्यन्न किंचन।**
**तदेवाहं सदानन्दं ब्रह्मैवाहं सनातनम् ॥३२॥**

हा सगळा दृश्य स्वरूपातील विश्व प्रपंच ब्रम्हमात्र आहे. ब्रम्हाव्यतिरिक्त इतर काहीच नाही. तेच ब्रम्हरूप, सदैव आनंदरूप आणि सर्वदा स्थायी असलेले रूप माझेच आहे.

**त्वमित्येतत्तदित्येतन्मत्तोऽन्यन्नास्ति किंचन ।**
**चिच्चैतन्यस्वरूपोऽहमहमेव परः शिवः ॥ ३३ ॥**

या सर्व दृश्य जगातील सर्वच म्हणजे तुम्ही, आम्ही, हे माझ्याशिवाय अन्य किंवा निराळे असे काहीच नाही. मीच चैतन्यस्वरूप आहे, आणि मीच सर्वश्रेष्ठ असा शिवस्वरूप आहे.

**अतिभावस्वरूपोऽहमहमेव सुखात्मकः ।**
**साक्षिवस्तुविहीनत्वात्साक्षित्वं नास्ति मे सदा ॥ ३४ ॥**

माझे स्वरूप भावतीत असे आहे. तसेच सुखात्मक असेही माझे स्वरूप समज.दृश्य आणि दृष्टा असे द्वैत रूप माझे नाही. अद्वैत असे माझे स्वरूप असल्यामुळे मला पाहणारा दुसरा कुणी उरणारच नाही.

**केवलं ब्रह्ममात्रत्वादहमात्मा सनातनः ।**
**अहमेवादिशेषोऽहमहं शेषोऽहमेव हि ॥ ३५ ॥**

असे हे माझे केवळ ब्रम्हमात्र आणि स्थायी आत्मा स्वरूप आहे.माझे आदि रूप म्हणजेच प्रारंभिक रूप शेषाचे असून माझा शेषाचाच अवतार समज.

**नामरूपविमुक्तोऽहमहमानन्दविग्रहः ।**
**इन्द्रियाभावरूपोऽहं सर्वभावस्वरूपकः ॥ ३६॥**

नामरहित आणि रूपरहित असे माझे स्वरूप आहे. अर्थात मला नाम नाही, रूप-रंग नाही. माझ्या स्वरूपाशी येऊन मिळणा-याला माझे केवळ आनंद स्वरूपच दिसणार. तेच मोक्षाची प्राप्ती करून देणारे आहे. माझ्यात कोणतेही इंद्रिये नसून प्रत्येक भाव हे माझेच स्वरूप आहे..

**बन्धमुक्तिविहीनोऽहं शाश्वतानन्दविग्रहः ।**
**आदिचैत्तन्यमात्रोऽहमखण्डैकरसोऽस्म्यहम्॥३७॥**

माझे स्वरूप बंधनरहित आहे आणि मुक्ती रहित आहे. कोणत्याच बंधनात मला बांधता येत नाही, त्यामुळे मुक्तीच्या पल्याड असे माझे स्वरूप आहे. अखंड एकरस आणि चैतन्यमात्र असणारे माझे स्वरूप शाश्वत आनंद देणारे आहे. अशाश्वतापासून दूर नेणारे आहे.

**वाङ्मनोऽगोचरश्चाहं सर्वत्र सुखवानहम् ।**
**सर्वत्र पूर्णरूपोऽहं भूमानन्दमयोऽस्म्यहम् ॥ ३८॥**

सामान्य ज्ञानेंद्रियाद्वारे माझे स्वरूप कुणालाही आकलन होणारे नाही. माझ्याकडून दिव्य दृष्टी किंवा दिव्य ज्ञान प्राप्त झाल्याशिवाय माझ्या स्वरूपापर्यंत कुणीही पोहचू शकत नाही., असा मी नित्य सुखवान आहे.' पूर्णात्पूर्ण ' असा सर्वत्र मी पूर्णरूपात अतिशय आनंदमय आहो.

**सर्वत्र तृप्तिरूपोऽहं परामृतरसोऽस्म्यहम् ।**
**एकमेवाद्वितीयं सद्ब्रह्मैवाहं न संशयः ॥३९॥**

मी सर्व तृप्तीरूप आहे, मी अतिशय अमृतरस आहे,मी अद्वितीय परब्रह्म

आहे, यात तिळमात्रही संशय नाही.

**सर्वशून्यस्वरूपोऽहं सकलागमगोचरः।**
**मुक्तोऽहं मोक्षरूपोऽहं निर्वाणसुखरूपवान् ॥ ४० ॥**

सर्वशून्यता माझे स्वरूप आहे, संपूर्ण वेदवाङ्गमय माझे स्वरुप कथन करतात.मी मुक्त आहे, मोक्ष स्वरुप आहे,आणि निर्वाण माझे सुख आहे.

**सत्यविज्ञानमात्रोऽहं सन्मात्रानन्दवाहनम् ।**
**तुरीयातीतरूपोऽहं निर्विकल्पस्वरूपवान्॥४१॥**

मी सत्यविज्ञान आहे मी सन्मात्र आहे, आणि आनन्दयुक्त आहे.मी तुरियातीत आहे आणि निर्विकल्पस्वरुप

आहे.

**सर्वदा ह्यजरूपोऽहं नीरागोऽस्मि निरञ्जनः ।**
**अहं शुद्धोऽस्मि बुद्धोऽस्मि नित्योऽस्मि प्रभुरस्म्यहम्॥४२||**

मी सर्वदा 'अज' म्हणजेच अमर, अविनाशी आहो. रागरहित म्हणजेच आसक्ती रहित असे माझे स्वरूप आहे. असा मी निर्लेप, शुद्ध व बुद्ध असून नित्य माझे प्रभूरूप आहे.

**ओङ्कारार्थस्वरूपोऽस्मि निष्कलङ्कमयोऽस्म्यहम्।**
**चिदाकारस्वरूपोऽस्मि नाहमस्मि न सोऽस्म्यहम् ॥ ॥४३||**

ओंकार किंवा प्रणव याच नावाने लोक माझा पुकारा करतात. ओंकाराचा अर्थही मिच असून मी सर्वदा कलंकहीन, चिदाकारस्वरूपात आहे. मर्यादित स्वरूपात म्हणजे केवळ इथे किंवा तिथे असे माझे अस्तित्व नसून मी सर्वव्यापक आहो.

**न हि किंचित्स्वरूपोऽस्मि निर्व्यापारस्वरूपवान् ।**
**निरंशोऽस्मि निराभासो न मनोनेन्द्रियोऽस्म्यहम् ॥ ४४ ॥**

माझे विशिष्ट असे कोणतेच स्वरूप नाही. व्यापारहीनता हे माझे स्वरूप समज. मी अंशहीन, अप्रकट रूपात असून मनातीत अर्थात मनाने आणि इंद्रियांनी जाणण्यापलीकडचे माझे स्वरूप आहे.

**न बुद्धिर्न विकल्पोऽहं न देहादित्रयोऽस्म्यहम्।**
**न जाग्रत्स्वप्नरूपोऽहं न सुषुतिस्वरूपवान् ॥ ४५ ॥**

मी बुद्धी नाही, विकल्प नाही, स्थूल-सूक्ष्म-कारण देहही मी नाही. मानवी देहाच्या ज्या पहिल्या तीन अवस्था आहेत, अर्थात् जागृत, स्वप्न व सुषुप्ती अवस्था मी नाही.

**न तापत्रयरूपोऽहं नेषणात्रयवानहम् ।**
**श्रवणं नास्ति मे सिद्धेर्मननं च चिदात्मनि ॥ ४६॥**

मी त्रिताप रहित म्हणजेच अध्यात्मिक, आधिभौतिक आणि आधिदैविक या त्रितापापासून मुक्त असे माझे स्वरूप आहे. इच्छा रहित चिदात्मस्वरूपात मी आहे. श्रवण, सिध्दी, मननाचेही माझ्यात कुठलेच स्थान नाही.

**सजातीयं न मे किंचिद्विजातीयं न मे क्वचित् ।**
**स्वगतं च न मे किंचिन्न मे भेदत्रयं क्वचित् ॥ ४७ ॥**

माझा कुणीही सजातीय नाही किंवा विजातीय नाही. माझ्या स्वत:त विद्यमान असे काहीच नाही. सृष्टीचे जे तीन भेद आहेत, ते उत्पत्ती, स्थिती व लय याचा देखील माझ्या स्वरूपाला स्पर्श होऊ शकत नाही.

**असत्यं हि मनोरूपमसत्यं बुद्धिरूपकम् ।**
**अहंकारमसद्धीति नित्योऽहं शाश्वतो ह्यजः ॥ ४८ ॥**

मनाचे रूप, बुद्धीचे रूप आणि अहंकाराचे रूप हे सगळे अशाश्वत आणि असत् पदार्थ आहेत. तर माझे रूप हे नित्य, शाश्वत आणि अमर आहे.

**देहत्रयमसद्विद्धि कालत्रयमसत्सदा ।**
**गुणत्रयमसद्विद्धि ह्यहं सत्यात्मकः शुचिः ॥ ४९ ॥**

स्थूल-सूक्ष्म-कारण देह ,त्याचप्रमाणे भूत-भविष्य -वर्तमानकाळ हे अशाश्वत स्वरूपाचे आहे. सत्व-रज -तम हे त्रिगुण देखील असत् म्हणजेच अशाश्वत स्वरूपाचे आहे. माझे स्वरूप सत्य आणि पवित्र आहे.

**श्रुतं सर्वमसद्विद्धि वेद सर्वमसत्सदा ।**
**शास्त्रं सर्वमसद्विद्धि ह्यहं सत्यचिदात्मकः ॥ ५० ॥**

सर्व उपदेश अर्थात शास्त्रे,वेद,असत् आहेत,अशाश्वत आहेत. या सर्वात सत्य म्हणजे माझे चिदाकार रूप समज.

**मूर्तित्रयमसद्विद्धि सर्वभूतमसत्सदा ।**
**सर्वतत्त्वमसद्विद्धि ह्यहं भूमा सदाशिवः ॥५१॥**

या सृष्टीचे चालक, पालक व संहारक अर्थात ब्म्हा, विष्णू, महेश हे देखील असत्य समजावे. सर्व पंचमहाभूतं म्हणजेच पृथ्वी, जल ,वायु, अग्नी , आकाश आणि सर्व जीवमात्र हे देखील असत्य समजावे. समग्र तत्व असत्य आहे. केवळ माझेच रूप अनन्त आहे. मी केवळ सदाशिव सत्यस्वरूप आहे.

**गुरुशिष्यमसद्विद्धि गुरोर्मन्त्रमसत्ततः ।**
**यदृश्यं तदसद्विद्धि न मां विद्धि तथाविधम् ॥ ५२ ॥**

गुरू आणि शिष्य, गुरूप्रमाणित मंत्र, जे काही दृश्य स्वरूपात दिसते आहे ते सारे काही असत्य आहे. मला मात्र तसे म्हणजे असत्य समजू नको. अंतिम सत्य मीच आहे.

**यच्चिन्त्यं तदसद्विद्धि यन्त्र्याय्यं तदसत्सदा ।**
**यद्धितं तदसद्विद्धि न मां विद्धितथाविधम् ॥ ५३॥**

सृष्टीतील जे जे काही चिंतनीय आहे, वाणीचा विषय आहे, जे हित म्हणून आपण मानतो, ते ते सर्व असत्य अर्थात अशाश्वत आहे. मात्र या असत्य - अशाश्वत गोष्टीसारखे मला समजू नको.

**सर्वान्प्राणानसद्विद्धि सर्वान्भोगानसत्त्विति ।**
**दृष्टिं श्रुतमसद्विद्धि ओतं प्रोतसमन्मयम्॥५४॥**

चराचर सृष्टीतले सर्व जीवमात्र असत्य स्वरूप आहे. सर्व भोगादी क्रिया, प्रत्यक्ष पाहिलेले, न पाहिलेले आणि जे जे काही दृश्य स्वरूपात सर्वदूर ओतप्रोत भरलेले आपण पाहतो -ते सर्व असत्य समज.

**कार्याकार्यमसद्विद्धि नष्टं प्राप्तमसन्मयम् ।**
**दुःखादुःखमसद्विद्धि सर्वासर्वमसन्मयम्॥५५॥**

कार्य आणि अकार्य, नष्ट आणि प्राप्त, दु:ख-अदु:ख त्याचप्रमाणे सर्व आणि असर्व हे सगळे असत्य स्वरूप आहे.

**पूर्णापूर्णमसद्विद्धि धर्माधर्ममसन्मयम् ।**
**लाभालाभावसद्विद्धि जयाजयमसन्मयम्॥५६॥**

पूर्ण व अपूर्ण, धर्म व अधर्म, लाभ व अलाभ तसेच जय आणि पराजय हे सगळे काही असत्य स्वरूपातील आहे.

**शब्द सर्वमसद्विद्धि स्पर्श सर्वमसत्सदा।**
**रूपं सर्वमसद्विद्धि रसं सर्वमसन्मयम् ॥५७॥**

**गन्धं सर्वमसद्विद्धि सर्वाज्ञानमसन्मयम्।**
**असदेव सदा सर्वमसदेव भवोद्भवम् ॥५८॥**

पंच तन्मात्र अर्थात् शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध हे सगळे असत्य स्वरूपातील आहे.अवघे अज्ञान आणि या सृष्टीत उत्पन्न झालेले एकूण एक पदार्थ हे सारे असत्य स्वरूप समज.

**असदेव गुणं सर्व सन्मात्रमहमेव हि।**
**स्वात्ममन्त्रं सदा पश्येत्स्वात्ममन्त्रं सदाभ्यसेत् ॥ ५९॥**

या जगतातील सारे गुण असत्य असून माझे स्वरूप केवळ सन्मात्र आहे, मीच सन्मात्र स्वरूप यमज. आत्ममंत्र याकडेच सर्वदा लक्ष असू द्यावा, त्याचाच सदैव अभ्यास करावा.

**अहं ब्रह्मास्मि मन्त्रोऽयं दृश्यपापं विनाशयेत् ।**
**अहं ब्रह्मास्मि मन्त्रोऽयमन्यमन्त्रं विनाशयेत् ॥ ६० ॥**

'अहं ब्रम्हास्मि ' म्हणजेच मी ब्रम्ह आहे, हा मंत्र सगळया पापांचा नाश करतो. एवढेच काय तर या मंत्राचे सामर्थ्य इतके अचाट आहे की या मंत्राने अन्य इतर मंत्रांचा देखील नाश होऊ शकतो.

**अहं ब्रह्मास्मि मन्त्रोऽयं देहदोषं विनाशयेत् ।**
**अहं ब्रह्मास्मि मन्त्रोऽयं जन्मपापं विनाशयेत् ॥ ६१ ॥**

'अहं ब्रम्हास्मि ' हा इतका सामर्थ्य शाली मंत्र आहे की याच्या पठणाने शरीर दोष दूर होतात. जन्मास कारणीभूत असणा-या पापांचाही समूळ नाश या मंत्राच्या वाचनाने होतो.

**अहं ब्रह्मास्मि मन्त्रोऽयं मृत्युपाशं विनाशयेत् ।**
**अहं ब्रह्मास्मि मन्त्रोऽयं द्वैतदुःखं विनाशयेत् ॥६२॥**

'अहं ब्रम्हास्मि' या मंत्रामुळे जन्म-मृत्युच्या फे-यातून मानवी जीवाची सुटका होते. यामुळेच द्वैतभावना नष्ट होऊन त्यामागोमाग येणा-या दुःखांचाही नाश होतो.

**अहं ब्रह्मास्मि मन्त्रोऽयं भेदबुद्धिं विनाशयेत्।**
**अहं ब्रह्मास्मि मन्त्रोऽयं चिन्तादुःखं विनाशयेत् ॥६३॥**

या 'अहं ब्रम्हास्मि ' मंत्राच्या पठणामुळे भेदबुद्धी, चिंता व दु:ख यांचा नाश होतो.

**अहं ब्रह्मास्मि मन्त्रोऽयं बुद्धिव्याधिं विनाशयेत् ।**
**अहं ब्रह्मास्मि मन्त्रोऽयं चित्तबन्धं विनाशयेत् ॥६४॥**

' अहं ब्रम्हास्मि ' या मंत्रामुळे बुध्दीदोष नाहीसा होतो., चित्त बंधनातून मुक्त होतो.

**अहं ब्रह्मास्मि मन्त्रोऽयं सर्वव्याधीन्विनाशयेत् ।**
**अहं ब्रह्मास्मि मन्त्रोऽयं सर्वशोकं विनाशयेत् ॥६५॥**

'अहं ब्रम्हास्मि ' या शक्तिशाली मंत्रामुळे सगळ्या रोगांपासून मुक्ती मिळते. कोणत्याही प्रकारातील शोक नष्ट करण्याचे सामर्थ्यही या मंत्रात आहे. अर्थात् षड्विकारांचे प्राबल्य पूर्णपणे नष्ट होते.

**अहं ब्रह्मास्मि मन्त्रोऽयं कामादीन्नाशयेत्क्षणात् ।**
**अहं ब्रह्मास्मि मन्त्रोऽयं क्रोधशक्तिं विनाशयेत् ॥६६॥**

'अहं ब्रम्हास्मि ' हा मंत्र काम या दोषाचे समूळ उच्चाटन करतो तर क्रोधातील वाईट शक्तिचा नाश करतो. हो

**अहं ब्रह्मास्मि मन्त्रोऽयं चित्तवृत्तिं विनाशयेत् ।**
**अहं ब्रह्मास्मि मन्त्रोऽयं संकल्पादीन्विनाशयेत् ॥ ६७॥**

'अहं ब्रम्हास्मि 'या मंत्रामुळेच  चित्ता तील सर्व वृत्ती लयास जातात. संकल्प इत्यादींचा नाश होतो.

**अहं ब्रह्मास्मि मन्त्रोऽयं कोटिदोषं विनाशयेत् ।**
**अहं ब्रह्मास्मि मन्त्रोऽयं सर्वतन्त्रं विनाशयेत् ॥ ६८ ॥**

वरील सर्व श्लोकांवरून असे प्रत्ययास येते की कोट्यावधी दोषांचा आणि विविध तंत्रांचा नाश करण्याचे सामर्थ्य या श्लोकात आहे.

**अहं ब्रह्मास्मि मन्त्रोऽयमात्माज्ञानं विनाशयेत् ।**
**अहं ब्रह्मास्मि मन्त्रोऽयमात्मलोकजयप्रदः ॥ ६९ ॥**

आत्म्याबद्दलच्या अनेक भ्रामक कल्पना आज जनमानसात फोफावत चालल्या आहेत. ते केवळ अज्ञानामुळेच!  तर हे अज्ञान या मंत्राच्या पठणामुळे दूर होते. परिणामत: आत्मलोकावर विजय प्राप्त करण्यास हा मंत्र फलदायी ठरतो.

**अहं ब्रह्मास्मि मन्त्रोऽयमप्रतर्क्यसुखप्रदः ॥**
**अहं ब्रह्मास्मि मन्त्रोऽयमजडत्वं प्रयच्छति ॥ ७० ॥**

'अहं ब्रम्हास्मि ' या मंत्रामुळे अकल्पनीय सुख प्राप्त होते. हा मंत्र अजडता अर्थात् ज्ञान प्रदान करणारा ठरतो.

**अहं ब्रह्मास्मि मन्त्रोऽयमनात्मासुरमर्दनः ।**
**अहं ब्रह्मास्मि वज्रोऽयमानत्माख्यगिरीन्हरेत् ॥ ७१ ॥**

या मंत्रामुळे अनात्मभावरूपी असुरांचा नाश होतोच पण त्याचबरोबर सगळयांना मोक्ष प्रदान करण्याचे महत्वपूर्ण कार्य देखील या मंत्राद्वारेच होत असते आणि अनात्मभावरूपी महाकाय पर्वतांचे उच्चाटन करतो.

**अहं ब्रह्मास्मि मन्त्रोऽयमनात्माख्यासुरान्हरेत् ।**
**अहं ब्रह्मास्मि मन्त्रोऽयं सर्वांस्तान्मोक्षयिष्यति ॥७२॥**

या मंत्रामुळे अनात्मभावरूपी असुरांचा नाश होतोच पण त्याचबरोबर सगळयांना मोक्ष प्रदान करण्याचे महत्वपूर्ण कार्य देखील या मंत्राद्वारेच होत

असते .

**अहं ब्रह्मास्मि मन्त्रोऽयं ज्ञानानन्दं प्रयच्छति।**
**सप्तकोटिमहामन्त्रं जन्मकोटिशतप्रदम् ॥७३॥**

ज्ञानमय आनंद देणारा असा हा अहं ब्रम्हास्मि मंत्र आहे. हाच मंत्र सात कोटी महामंत्र आणि शंभर कोटी जन्माचे सुख प्रदान करणारा आहे.

**सर्वमन्त्रान्समुत्सृज्य एतं मन्त्र समभ्यसेत् ।**
**सद्यो मोक्षमवाप्नोति नात्र संदेहमण्वपि॥७४॥**

अशा या शाश्वत सुख प्रदान करणा-या मंत्राचाच इतर मंत्रांपेक्षा सदैव जप करावा. या मंत्राच्या अखंड जपामुळे साधक मोक्षाप्रत जाऊन पोहचतो, हो यात तीळमात्र शंका नाही.

**॥ इति तृतीयोध्याय: ॥**

## ।। अथ चतुर्थोध्याय: ।।

**कुमारः परमेश्वरं पप्रच्छ जीवन्मुक्तविदेहमुक्तयोः स्थितिमनुब्रूहीति ।**

**स होवाच पर: शिव:-**

**चिदात्माहं परात्माहं निर्गुणोऽहं परात्परः ।**
**आत्ममात्रेण यस्तिष्ठेत्स जीवन्मुक्त उच्यते ॥ १॥**

या चौथ्या अध्यायातील पहिल्या श्लोकात कुमारने आपल्या पित्याकडून म्हणजेच भगवान शिवाकडून जीवन्मुक्त आणि विदेह मुक्त विभूतींची लक्षणे आणि स्थिती जाणून घेण्याची जिज्ञासा व्यक्त केली आहे.

**देहक्षयातिरिक्तोऽहं शुद्धचैतन्यमस्म्यहम्।**
**ब्रह्माहमिति यस्यान्तः स जीवन्मुक्त उच्यते ॥ २ ॥**

पहिल्या श्लोकात कुमारने विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर भगवान शिवाने या दुस-या श्लोकात दिले आहे. ते म्हणतात, मी चिदात्मा, परात्मा आणि निर्गुण आहो. मी परात्पर अर्थात् श्रेष्ठाहून श्रेष्ठ आहो. अशाप्रकारे मी केवळ

**आनन्दघनरूपोऽस्मि परानन्दघनोऽस्म्यहम्।**

**यस्य देहादिकं नास्ति यस्य ब्रह्मेति निश्चयः ।**
**परमानन्दपूर्णो यः स जीवन्मुक्त उच्यते ॥ ३॥**

आत्ममात्र अर्थात् देहबुद्धीविरहित म्हणजेच शरीर आणि वासनाविरहित माझे अस्तित्व आहे. यालाच जीवन्मुक्त लक्षणे म्हणतात. माझे आनंदघन आणि परानंदघन रूप आहे. देहभाव शिल्लकच राहिलेला नाही,तर ब्रम्हभावच सर्वत्र व्यापून उरला आहे. जे परमानंदाने परिपूर्ण असून जीवन्मुक्त आहे.

**यस्य किंचिदिह नास्ति चिन्मात्रेणाव शिष्यते।**
**चैतन्यमात्रो यस्यान्तश्चिन्मात्रैकस्वरूपवान् ॥ ४ ॥**

**सर्वत्र पूर्णरूपात्मा सर्वत्रात्मावशेषकः ।**
**आनन्दरतिरव्यक्तः परिपूर्णश्चिदात्मकः ॥५॥**

**शुद्धचैतन्यरूपात्मा सर्वसङ्गविवर्जितः ।**
**नित्यानन्दः प्रसन्नात्मा ह्यन्यचिन्ताविवर्जितः ॥ ६ ॥**

**किंचिदस्तित्वहीनो यः स जीवन्मुक्त उच्यते ।**

ज्याच्या अंतरात अहंभावाचा लवलेश ही नाही, जो चिन्मात्र म्हणजेच 'मी शुध्द चैतन्य आहे ' या भावनेत सदैव स्थित आहे, जो चैतन्यमात्र असून ज्याचे अंत:करण केवळ चित्तस्वरूप आहे, जो सर्वत्र पूर्णरूप -आत्मस्वरूप आहे, सर्वत्र निश्चयात्मक असा आत्मभाव आहे, आनंदभाव आहे, परिपूर्ण चिदात्म आणि शुध्द चैतन्यरूप आहे, अप्रकट अशा स्थतीत नित्य आनंदरूप आणि प्रसन्न व निर्मल स्वरूप आहे. शरीराप्रती मनात कोणतेच विचार नसणे आणि चिंतारहित असणे -, ही सगळी जीवन्मुक्ताची लक्षणे आहेत.

**न मे चित्तं न मे बुद्धिर्नाहंकारी न चेन्द्रियम्॥७॥**

**न मे देहः कदाचिद्वा न मे प्राणादयः क्वचित् ।**
**न मे माया न मे कामो न मे क्रोधः परोऽस्म्यहम् ॥ ८ ॥**

**न मे किंचिदिदं वापि न मे किंचित्क्वचिज्जगत्।**
**न मे दोषो न मे लिङ्गं न मे चक्षुर्न मे मनः ॥ ९ ॥**

**न मे श्रोत्रं न मे नासा न मे जिह्वा न मे करः ।**
**न मे जाग्रन मे स्वप्नं न मे कारणमण्वपि॥ १० ॥**

**न मे तुरीयमिति यः स जीवन्मुक्त उच्यते।**

चित्त माझे नाही, बुद्धि माझी नाही, अहंकाररूप माझे नाही, इंद्रियरूपही माझे नाही. न देह माझा आहे, न प्राण माझा आहे. माझ्यात माया नाही, कामक्रोधादी षड्विकारही  माझ्यात नाही.

या सर्वांपासून मी अलिप्त आहे. यांचा माझ्याशी काहीएक संबंध नाही. माझ्यात दोष नाहींत, माझ्यात लिंग अर्थातचटच

माझ्यात लिंग अर्थात् चिन्ह, चक्षु आणि मन ही नाही. श्रोत्र (कान),नाक, जिव्हा आणि हातही माझे नाही. जागृतावस्था, स्वप्नावस्था, सुषुप्तावस्था या अवस्था ही माझ्यात नाही. कारण देह असण्याचं तर काही कारणच नाही. इतकच काय तर परमावस्था म्हणजेच तुर्यावस्था ही माझी नाही ,असे जो समजतो तो जीवन्मुक्त समजावा.

**इदं सर्वं न मे किंचिदयं सर्वं न मे क्वचित् ॥ ११ ॥**

**न मे कालो न मे देशो न मे वस्तु न मे मतिः ।**
**न मे स्नानं न मे संध्या न मे दैवं न मे स्थलम् ॥१२॥**

**न मे तीर्थं न मे सेवा न मे ज्ञानं न मे पदम्।**
**न मे बन्धो न मे जन्म न मे वाक्यं न मे रविः ॥ १३ ॥**

**पुण्यं न मे पापं न मे कार्यं न मे शुभम्।**
**न मे जीव इति स्वात्मा न मे किंचिज्जगत् त्रयम् ॥ १४॥**

**न मे मोक्षो न मे द्वैतं न मे वेदो न मे विधिः।**
**न मेऽन्तिकं न मे दूरं न मे बोधो न मे रहः ॥ १५॥**

**न मे गुरुर्न मे शिष्यो न मे हीनो न चाधिकः ।**
**न मे ब्रह्मा न मे विष्णुर्न मे रुद्रो न चन्द्रमाः ॥ १६ ॥**

**न मे पृथ्वी न मे तोयं न मे वायुर्न मे वियत् ।**
**न मे बहिर्न मे गोत्रं न मे लक्ष्यं न मे भवः ॥ १७॥**

पुढे दिलेल्या कोणत्याच गोष्टी माझ्या नाहीत. देश, वस्तु, बुद्धि, मान्यता, स्नान, संध्या, भाग्य, स्थळ, तीर्थ, सेवा, ज्ञान, पद, बंधन, जन्म, वाक्य, सूर्य, पुण्य, पाप, कार्य शुभ कर्म, जीव, आत्मा (अत:करण)आणि त्रिलोक - भूलोक, अंतरिक्ष लोक, द्युलोक हे अवघे माझे नाही. एवढेच काय तर मोक्षही माझा नाही. माझ्यात द्वैत नाही न वेद न भाग्य! माझ्या निकटही कुणी नाही किंवा दूरही नाही. बोध म्हणजे एकांतही माझा नाही. मी गुरू नाही, शिष्य नाही, हीन नाही किंवा उच्चही नाही. ब्रम्ह, विष्णू, रूद्र, चंद्र, पृथ्वी, जल, वायु आकाश, अग्नी, गोत्र लक्ष्य, जन्म इ. इ. भूमंडळही माझे नाही.

**न मे ध्याता न मे ध्येयं न मे ध्यानं न मे मनुः ।**
**न मे शीतं न मे चोष्णं न मे तृष्णा न मे क्षुधा ॥ १८ ॥**

**न मे मित्रं न मे शुत्रुर्न मे मोहो न मे जयः।**
**न मे पूर्व न मे पश्चात्र मे चोर्ध्वं न मे दिशः ॥ १९॥**

**न मे वक्तव्यमल्पं वा न मे श्रोतव्यमण्वपि**
**न मे गन्तव्यमीषद्वा न मे ध्यातव्यमण्वपि॥ २० ॥**

**भोक्तव्यमीषद्वा न मे स्मर्तव्यमण्वपि**

**न मे**

**न मे भोगो न मे रागो न मे यागो न मे लयः।**

**न मे मौर्ख्यं न मे शान्तं न मे बन्धो न मे प्रियम्।**
**न मे मोद: प्रमोदी वा न मे स्थूलं न मे कृशम् ॥ २२ ॥**

**न मे दीर्घ न मे ह्स्वं न मे वृद्धिनं मे क्षयः ।**
**अध्यारोपोऽपवादो वा न मे चैकं न मे बहु॥ २३ ॥**

ध्याता, ध्येय, ध्यान आणि मनन हेही माझे नाही. मला मला शीत किंवा

उष्ण कोणताच अनुभव येत नाही. माझ्याजवळ न तहान आहे, न भूक!

माझा कुणी मित्र नाही किंवा शत्रुही नाही. माझ्यात मोह नाही, जय नाही, पूर्व -पश्चातही नाही, दाही दिशातही नाही. माझ्यात काहीच वक्तव्य नाही, श्रोतव्य, गंतव्य ही नाही. आधी

ध्यातव्य नाही, भोक्तव्य ही नाही. मी स्मरणयोग्य नाही. माझ्यात न भोग आहे न राग, न याग न लय! माझ्यात मुर्खता नाही, किंवा मला कुठलेच बंधन नाही. मला कुणीच प्रिय नाही किंवा माझ्यात मोद-प्रमोद नाही. मी स्थूल नाही किंवा कृशही नाही. मी दीर्घ नाही, -हस्वही नाही. माझ्यात वृद्धि नाही तसेच मला क्षयही नाही. अध्यारोप किंवा अपवादही नाही. एक किंवा अनेक असे देखील माझे स्वरूप नाही.

**न मे आन्ध्यं न मे मान्द्यं न मे पविदमण्वपि ।**
**न मे मांस न मे रक्त न मे मेदो न मे ह्यसक॥ २४॥**

**न मे मदान मेऽस्थिर्वा न मे त्वग्धातुसप्तकम्।**
**न मे शुक्रं न मे रक्तं न मे नीलं न मे पृथक॥ २५ ॥**

**न मे तापो न मे लाभो मुख्यं गौणं न मे क्वचित् ।**
**न मे भ्रान्तिर्न मे स्थैर्य न मे गुह्यं न मे कुलम् ॥ २६ ॥**

**न मे त्याज्यं न मे ग्राह्यं न मे हास्यं न मे नयः ।**
**न मे वृत्तं न मे ग्लानिर्न मे शोष्यं न मे सुखम् ॥ २७ ॥**

**न मे ज्ञाता न मे ज्ञानं न मे ज्ञेयं न मे स्वयम् ।**
**न मे तुभ्यं न मे मह्यं न मे त्वं च न मे त्वहम् ॥ २८ ॥**

**न मे जरा न मे बाल्यं न मे यौवनमण्वपि ।**
**अहं ब्रह्मास्म्यहं ब्रह्मास्म्यहं ब्रह्मेति निश्चयः ॥ २९ ॥**

**चिदहं चिदहं चेति स जीवन्मुक्त उच्यते।**
**ब्रह्मैवाहं चिदेवाहं परो वाहं न संशयः ॥ ३०॥**

माझ्यात काय काय नाही हे विस्तृतपणे सांगताना भगवान शिव म्हणतात, माझ्यात आंधळेपणा नाही, मंदता नाही, किंचितही कुशलता नाही, मांस नाही, रक्त नाही, मेद, रस, मज्जा नाही. अस्थि नाही, त्वचा नाही, सप्त धातू पण नाहीत. शुक्ल वर्ण, रक्त, निळा रंग आणि पृथक भावही माझ्यात नाही. माझ्यात ताप, लाभ, मुख्य भाव किंवा गौण भावही नाहीत. माझ्यात न भ्रांती आहे, न स्थिरता, न गोपनीयता, न कुळ आहे. माझ्यासाठी काहीही त्याज्य नाही, ग्राह्य नाही, हास्य नाही, नीती, आचरण, ग्लानी आणि सुखही नाही. मला कुणीही ज्ञाता नाही, माझ्याजवळ ज्ञान नाही, ज्ञेय नाही. इतकच काय तर मी स्वत:ही नाही. माझ्यात वृद्धावस्था नाही, बालपण नाही आणि यौवन के देखील नाही. या श्लोकात आता शेवटी मी काय आहे, हे शिव सांगतात. त्रिवारपणे मी ब्रम्ह आहे, मीच चित्त आहो. अशा प्रकारच्या भावना ज्याच्या मनात उद्दिपित झाल्या आहेत आणि जो नि:संशयपणे या गोष्टींवर दृढतापूर्वक विश्वास ठेवतो, त्यालाच जिवन्मुक्त म्हणावे.

**स्वयमेव स्वयं हंसः स्वयमेव स्वयं स्थितः ।**

**स्वयमेव स्वयं पश्येत्स्वात्मराज्ये सुखं वसेत् ।**
**स्वात्मानन्दं स्वयं भोक्ष्येत्स जीवन्मुक्त उच्यते ॥ ३१ ॥**

जे स्वयमेव हंस आहेत, ज्यांनी शरीरात आत्मभाव सोडला आहे,जे स्वयमेव स्वत:तच अर्थात आत्मतत्वातच स्थित आहे, जे आत्मतत्वाला प्रत्यक्षता पाहत असतात, जे आत्मराज्यातच सुखाची अनुभूती करतात, जे स्वत: स्वात्मानंदस्वरूप आहे आणि सतत त्यातच रममाण असतात. हीच सर्व जीवन्मुक्ताची लक्षणे आहेत.

**स्वयमेवैकवीरोऽग्रे स्वयमेव प्रभुः स्मृतः ।**
**स्वस्वरूपे स्वयं स्वप्स्ये स जीवन्मुक्त उच्यते ॥ ३२॥**

जो स्वत: एकवीर आहे, अर्थात मनादी  इंद्रियांवर ज्याने विजय मिळवून निर्भय पदावर आरूढ झाला आहे, जो स्वत: प्रभूरूप असून स्वस्वरूपातच ज्यांचा वास आहे, त्यांना जीवन्मुक्त म्हणतात.

**ब्रह्मभूत: प्रशान्तात्मा ब्रह्मानन्दमयः सुखी।**
**स्वच्छरूपो महामौनी वैदेही मुक्त एव सः ॥३३॥**

जो ब्रह्मयुक्त आहे, निर्मल आत्मा आहे, ब्राह्मनन्दमय आहे, नित्य सुखस्वरूप असलेला महामौनी आहे त्याला विदेहमुक्त अशी संज्ञा आहे.

**सर्वात्मा समरूपात्मा शुद्धात्मा त्वहमुत्थितः ।**
**एकवर्जित एकात्मा सर्वात्मा स्वात्ममात्रकः ॥ ३४ ॥**

**अजात्मा चामृतात्माहं स्वयमात्माहमव्ययः ।**
**लक्ष्यात्मा ललितात्माहं तूष्णीमात्मस्वभाववान् ॥ ३५ ॥**

**आनन्दात्मा प्रियो ह्यात्मा मोक्षात्मा बन्धवर्जितः ।**
**ब्रह्मैवाहं चिदेवाहमेवं वापि न चिन्त्यते ॥ ३६॥**

**चिन्मात्रेणैव यस्तिष्ठेद्वैदेही मुक्त एवः सः ॥ ३७॥**

जो सर्वांमध्ये आत्मभान आहे, तो एकरूप, शुद्ध आहे, "मी ब्रह्मस्वरूप आहे". भावनेने जागृत, (उठले) आहे, संख्याविरहित आहे, म्हणजेच अनेकांचे अस्तित्व आहे पण त्यापैकी एकालाच एक म्हणतात, हे पद त्याचे नाही.  फक्त स्वत: आहे.  "सर्व खेडूत जग मी ब्रह्मस्वरूपात आहे" असा आहे ज्याचा विश्वास आहे, आत्म्यावर विश्वास आहे - जे अज, अमृत, आत्मा स्वरूप आहे, अपरिवर्तनीय, ध्येय ठेवणारा आत्मा, उत्तम स्वरूप, आत्मा, शांत स्वभाव आनंद हा आत्मा आहे, ज्याला आत्मसमता प्रिय

आहे, मोक्षाचे रूप आहे, बंधनातून मुक्त आहे, "मी ब्रह्म आहे.मी आहे' - ही भावना ज्यामध्ये स्थिर आहे, जो स्वतःला चित रूपात पाहतो,तो केवळ चैतन्याच्या रूपात स्थिर असतो, त्याला विदेह मुक्त म्हणतात.

**निश्चयं च परित्यज्य अहं ब्रह्मेति निश्चयम् ।**
**आनन्दभरितस्वान्तो वैदेही मुक्त एव सः ॥ ३८ ॥**

ज्याच्या अंतरात 'मी ब्रम्ह आहे ' हाच निश्चय दृढ झालेला आहे, या व्यतिरिक्त कोणत्याही निश्चयाला त्याच्या मनात स्थान नाही आणि ज्याचे हृदय सर्वदा आनंदाने ओतप्रोत भरलेले आहे;तोच विदेहमुक्त म्हणवल्या जातो.

**सर्वमस्तीति नास्तीति निश्चयं त्यज्य तिष्ठति ।**
**अहं ब्रह्मास्मि नास्मीति सच्चिदान्दमात्रकः ॥ ३९ ॥**

**किंचित्क्वचित्कदाचिच्च आत्मानं न स्पृशत्यसौ ।**
**तूष्णीमेव स्थितस्तूष्णीं तूष्णीं सत्यं न किंचन ॥ ४० ॥**

**परमात्मा गुणातीतः सर्वात्मा भूतभावनः ।**
**कालभेदं वस्तुभेदं देशभेदं स्वभेदकम् ॥४१॥**

**किंचिद्भेदं न तस्यास्ति किंचिद्वापि न विद्यते।**
**अहं त्वं तदिदं सोऽयं कालात्मा कालहीनकः ॥ ४२ ॥**

**शून्यात्मा सूक्ष्मरूपात्मा विश्वात्मा विश्वहीनकः ।**
**देवात्मा देवहीनात्मा मेयात्मा मेयवर्जितः ॥ ४३ ॥**

**सर्वत्र जडहीनात्मा सर्वेषामन्तरात्मकः ।**
**सर्वसंकल्पहीनात्मा चिन्मात्रोऽस्मीति सर्वदा ॥४४॥**

**केवलः परमात्माहं केवलो ज्ञानविग्रहः ।**
**सत्तामात्रस्वरूपात्मा नान्यत्किंचिज्जगद्भयम् ॥ ४५ ॥**

**जीवेश्वरेति वाक् क्वेति वेदशास्त्राद्यहं त्विति ।**
**इदं चैतन्यमेवेति अहं चैतन्यमित्यपि॥४६॥**

**इति निश्चयशून्यो यो वैदेही मुक्त एव सः ।**
**चैतन्यमात्रसंसिद्धः स्वात्मारामः सुखासनः ॥४७॥**

**अपरिच्छिन्नरूपात्मा अणुस्थूलादिवर्जितः ।**
**तुर्यतुर्यः परानन्दो वैदेही मुक्त एव सः ॥४८॥**

जी व्यक्ती 'मी ब्रम्ह आहे' या निश्चयावर ठाम असते, मी सत् चित् आनंद मात्र आहे, जे कधीही अन्य कुठल्याच पदार्थात आत्मभावाचा स्पर्श होऊ देत नाही, अर्थातच मौन भाव बाळगून असतात. ज्यांच्यासाठी मौन आणि सत्य यात काहीच फरक रहात नाही, जो परमात्म स्वरूप त्रिगुणातीत आहे, सर्वात्मा आहे, पंचभूतांवर ज्याचे नियंत्रण आहे, तोच विदेह मुक्त आहे. पुढे विदेह मुक्त असणारा आणखी कसा असतो हे सांगताना भगवान शिव म्हणतात, जो कालभेद, वस्तु-भेद, देशभेद, आणि स्व-भेद असे कोणत्याच प्रकारचे भेद मानीत नाही, जो कालस्वरूप व कालहीन आहे, शून्यस्वरूप, सूक्ष्म स्वरूप विश्वात्मा आहे तो निश्चितच विदेह मुक्त आहे. जो विश्वाहून वेगळा देवात्मा आहे पण देवभावरूपी अहंभाव त्याच्यात नाही, जो ज्ञानस्वरूप आहे पण ज्ञानाचा अहंभाव ज्याच्यात नाही, जो सदैव जड-भाव रहित आणि संकल्परहित आहे, मी चिन्मात्र स्वरूप आहे, असा दृढनिश्चय जो ठेवतो तोच विदेहमुक्त खचितच समजावा. मी केवळ परमात्मा आहे, ज्ञान माझे स्वरूप आहे, सत्तामात्र हेच माझे स्वरूप आहे, त्याव्यतिरिक्त कोणतेच जग नाही. जी व्यक्ती स्वयं वेदशास्त्र रूप आहे, चैतन्यस्वरूप आहे, मी पण चैतन्यच आहो असा ज्याला विश्वास च नव्हे तर निश्चय आहे त्याला विदेहमुक्त म्हणतात. जो चैतन्यमात्र असा दृढनिश्चय बाळगून संसिध्द स्वात्माराम , आनंदात स्थिर असतात, ज्याचे अपरिच्छिन्न रूप आहे, अणू, स्थूल इत्यादी भावनांच्या जे पल्याड आहे, थोडक्यात म्हणजे तुर्या अवस्था जी परम समाधी युक्त आहे, परम आनंद स्वरूप आहे, ते विदेह मुक्त

समजावे.

**नामरूपविनीनात्मा परसंवित्सुखात्मकः ।**
**तुरीयातीतरूपात्मा शुभाशुभविवर्जितः ॥ ४९ ॥**

**योगात्मा योगयुक्तात्मा बन्धमोक्षविवर्जितः ।**
**गुणागुणविहीनात्मा देशकालविवर्जितः ॥५०॥**

**साक्ष्यसाक्षित्वहीनात्मा किंचित्किंचिन्त्र किंचन।**
**यस्य प्रपञ्चमानं न ब्रह्माकारमपीह न॥ ५१ ॥**

**स्वस्वरूपे स्वयंज्योतिः स्वस्वरूपे स्वयंरतिः ।**
**वाचामगोचरानन्दो वाङ्गनोगोचरः स्वयम् ॥५२॥**

जो नामरूप रहित आहे, उत्कृष्ट बोधरूप व सुखरूप आहे तुरीयातीत आहे, शुभ -अशुभ रहित जो योगरूप आहे, योगयुक्त आहे, बंधमोक्षरहित, गुण-अवगुण, देशकालादी रहित, साक्षी -असाक्षी भाव नसलेला, ज्याला प्रपंचाचे भान नाही, ब्रम्हभाव नाही, जो स्वस्वरूपात स्थित आहे, स्वत: ज्योती स्वरूप आहे, स्वस्वरूपातच आनंदाचा अनुभव घेतो आहे, अशा परमोच्च स्थितीत वाणी किंवा मन ही इंद्रिये देखील पोहचू शकत नाही. अशा लक्षणांसह ज्याच्यात अतीतातीत भाव सुद्धा नाहीत त्याला विदेहमुक्त म्हणतात.

**अतीतातीतभावो यो वैदेही मुक्त एव सः ।**
**चित्तवृत्तेरतीतो यश्चित्तवृत्त्यवभासकः ॥५३॥**

**सर्ववृत्तिविहीनात्मा वैदेही मुक्त एव सः ।**
**तस्मिन्काले विदेहीति देहस्मरणवर्जितः ॥५४॥**

**ईषन्मात्रं स्मृतं चेद्यस्तदा सर्वसमन्वितः ।**
**परैरदृष्टबाह्यात्मा परमानन्दचिद्धनः ॥५५॥**

**परैदृष्टबाह्यात्मा सर्ववेदान्तगोचरः ।**
**ब्रह्मामृतरसास्वादो ब्रह्मामृतरसायनः ॥५६॥**

**ब्रह्मामृतरसासक्तो ब्रह्मामृतरसः स्वयम् ।**
**ब्रह्मामृतरसे मग्नो ब्रह्मानन्दशिवार्चनः॥५७॥**

**ब्रह्मामृतरसे तृप्तो ब्रह्मानन्दानुभावकः ।**
**ब्रह्मानन्दशिवानन्दो ब्रह्मानन्दरसप्रभः ॥५८॥**

**ब्रह्मानन्दपरं ज्योतिर्ब्रह्मानन्दनिरन्तरः ।**
**ब्रह्मानन्दरसान्नादो ब्रह्मानन्दकुटुम्बकः॥५९॥**

**ब्रह्मानन्दरसारूढो ब्रह्मानन्दैकचिद्धनः ।**
**ब्रह्मानन्दरसोद्वाहो ब्रह्मानन्दरसंभरः ॥६०॥**

**ब्रह्मानन्दजनैर्युक्तो ब्रह्मानन्दात्मनि स्थितः।**
**आत्मरूपमिदं सर्वमात्मनोऽन्यन्न किंचन ॥ ६१ ॥**

**सर्वमात्माहमात्मास्मि परमात्मा परात्मकः ।**
**नित्यानन्दस्वरूपात्मा वैदेही मुक्त एव सः ॥ ६२॥**

जो चित्तवृत्ति रहित आहे, तसेच सकलवृत्ती रहित आहे तो विदेहमुक्त समजावा. ज्याचा विदेहभाव स्थिर आहे, देह बुध्दी लयाला गेली आहे, स्मरण होत असतं ते केवळ सर्वभावयुक्त असतं, कोणतेच बाह्यस्वरूप तो जाणत नाही परंतु स्वत: परम आनंदरूप चिद्धन आहे, समस्त वेदांत ज्याची अभिव्यक्ति करतात, जो ब्रम्हामृत रसाचे आस्वादरूप आहे, ब्रम्हामृत रसस्वरूप आहे, जो ब्रम्हामृत रसातच आसक्त आहे आणि स्वत: ब्रम्हामृत रसस्वरूप असून ब्रम्हामृत रसातच मग्न आहे. ब्रम्हानंदाची अनुभूति ज्याच्यासाठी शिवअर्चना आहे, जो ब्रम्हामृत रसाने तृप्त आहे, ब्रम्हानंदाचा अनुभव करवणारा आहे. जो ब्रम्हानंद-शिवानंद स्वरूप आहे, ब्रम्हानंद हे ज्याच्यासाठी परमज्योतीस्वरूप आहे, ज्या व्यक्तित ब्रम्हानंदाची निरंतरता

आहे, ज्याच्यासाठी ब्रम्हानंद म्हणजेच एक नादकुटुंब आहे, जो ब्रम्हानंद रसावर आरूढ झालेला आहे, ब्रम्हानंद चिद्धन असून ब्रम्हानंद रसाचा प्रवाह आहे, ब्रम्हानंद रसाने भरलेला आहे असा ब्रम्हानंद युक्त लोकांनी युक्त आहे, ब्रम्हानंद रूपातच जो स्थिर आहे, ज्याच्यासाठी हेच आत्मस्वरूप आहे, अर्थात आत्मा व्यतिरिक्त अन्य काहीच नाही हा ज्याचा ठाम निश्चय आहे, सर्वत्र आत्मस्वरूप ज्याला दिसते ; नव्हे तर हाच ज्याचा दृढ विश्वास आहे तो विदेहमुक्त समजावा.

**पूर्णरूपो महानात्मा प्रीतात्मा शाश्वतात्मकः ।**
**सर्वान्तर्यामिरूपात्मा निर्मलात्मा निरात्मकः ॥ ६३॥**

**निर्विकारस्वरूपात्मा शुद्धात्मा शान्तरूपकः ।**
**शान्ताशान्तस्वरूपात्मा नैकात्मत्वविवर्जितः ॥६४॥**

**जीवात्मपरमात्मेति चिन्तासर्वस्ववर्जितः ।**
**मुक्तामुक्तस्वरूपात्मा मुक्तामुक्तविवर्जितः ॥ ६५ ॥**

**बन्धमोक्षस्वरूपात्मा बन्धमोक्षविवर्जितः ।**
**द्वैताद्वैतस्वरूपात्मा द्वैताद्वैतविवर्जितः ॥६६॥**

**सर्वासर्वस्वरूपात्मा सर्वासर्वविवर्जितः ।**
**मोदप्रमोदरूपात्मा मोदादिविनिवर्जितः ॥ ६७॥**

**सर्वसंकल्पहीनात्मा वैदेही मुक्त एव सः ।**

जो पूर्णरूप आहे, महान आत्मा, प्रीतात्मा आहे, शाश्वत आत्मा, सर्वांतर्यामी रूप आत्मा, निर्मल आत्मा, निरात्म अर्थात् माझे शून्य रूप आहे. निर्विकार स्वरूप शुद्ध, शांत, शांताशांतस्वरूप असून एकात्मभावरहित आहे. जीवात्मा हाच परमात्मा आहे, हा दृढ भाव ज्याचे ठायी सदैव वास करतो, जो समस्त चिंतारहित मुक्त-अमुक्तरूप म्हणजेच मुक्त अमुक्त भावरहित असतो तो नि:संशय विदेहमुक्त समजावा. ज्याचे बंध-मोक्ष स्वरूप आहे

आणि तो बोध-भावरहित आहे. सर्व आणि असर्व रूप भावरहित आहे. जो आनंदादी स्वरूप आहे, जो आमोद-प्रमोद युक्त आणि आमोद - प्रमोदरहितही आहे, त्याचप्रमाणे सर्वसंकल्परहित असणे हेच विदेह मुक्त असल्याचे लक्षण आहे.

**निष्कलात्मा निर्मलात्मा बुद्धात्मपुरुषात्मकः ॥ ६८ ॥**

**आनन्दादिविहीनात्मा अमृतात्मामृतात्मकः ।**
**कालत्रयस्वरूपात्मा कालत्रयविवर्जितः ॥ ६९॥**

**अखिलात्मा ह्यमेयात्मा मानात्मा मानवर्जितः ।**
**नित्यप्रत्यक्षरूपात्मा नित्यप्रत्यक्षनिर्णयः ॥ ७० ॥**

**अन्यहीनस्वभावात्मा अन्यहीनस्वयंप्रभः ।**
**विद्याविद्यादिमेयात्मा विद्याविद्यादिवर्जितः ॥७१॥**

**नित्यानित्यविहीनात्मा इहामुत्रविवर्जितः ।**
**शमादिषट्कशून्यात्मा मुमुक्षत्वादिवर्जितः ॥७२॥**

**स्थूलदेहविहीनात्मा सूक्ष्मदेहविवर्जितः ।**
**कारणादिविहीनात्मा तुरीयादिविवर्जितः ॥७३॥**

**अन्नकोशविहीनात्मा प्राणकोशविवर्जितः ।**
**मनः कोशविहीनात्मा विज्ञानादिविवर्जितः ॥ ७४॥**

**आनन्दकोशहीनात्मा पञ्चकोशविवर्जितः ।**
**निर्विकल्पस्वरूपात्मा सविकल्पविवर्जितः ॥ ७५ ॥**

**दृश्यानुविद्धहीनात्मा शब्दविद्धविवर्जितः ।**
**सदा समाधिशून्यात्मा आदिमध्यान्तवर्जितः ॥ ७६॥**

**प्रज्ञानवाक्यहीनात्मा अहंब्रह्मास्मिवर्जितः ।**
**तत्त्वमस्यादिहीनात्मा अयमात्मेत्यभावकः ॥ ७७॥**

**ओंकारवाच्यहीनात्मा सर्ववाच्यविवर्जितः ।**
**अवस्थात्रयहीनात्मा अक्षरात्मा चिदात्मकः ॥७८॥**

**आत्मज्ञेयादिहीनात्मा यत्किंचिदिदमात्मकः ।**
**भानाभानविहीनात्मा वैदेही मुक्त एव सः ॥७९॥**

जो कलारहित आत्मा आहे, निर्मल आत्मा आहे तोच बुद्ध स्वरूप आणि पुरूष स्वरूप आहे. जो अमृत व मृत उभयरूपी आहे, जो त्रिकालस्वरूप आणि त्रिकालरहित आहे, जो सर्वात्मरूप आहे, अमेय आहे परिमाणरूप आहे आणि परिणामरहित आहे ,नित्य -प्रत्यक्ष रूप आहे तो निश्चितच विदेहमुक्त आहे. नित्यप्रत्यक्ष ज्याचा निर्णय आहे, जो अन्यहून भिन्न आणि अन्यस्वरूप आहे, विद्या- अविद्यारहित आहे, नित्य -अनित्य विरहित आहे, कोणताच भाव ज्यामध्ये नाही, शम इत्यादी षट् संपत्ती रहित आहे, मुमुक्षु रहित, स्थूल सूक्ष्म देहरहित, कारण शरीर रहित, जागृती -स्वप्न-सुषुप्ती -तुर्या रहित म्हणजेच विदेह मुक्त! जो आनंदमय प्राणमय, मनोमय, विज्ञानमय आणि अन्नमयकोशरहित, निर्विकल्प स्वरूप, सविकल्परहित, दृश्यभाव ,शब्दसंस्पर्श, ज्यात नाही, जो सतत शून्यसमाधीत निमग्न असतो म्हणजेच त्याला विदेहमुक्त म्हणता येईल. जो आदि मध्य आणि अंत याने रहित आहे.

प्रज्ञानवाक्यहीन आत्मा, "अहं ब्रह्मास्मि" या विधानापासूनही विरहित आहे."तत्त्वमसि" या महावाक्याचाही त्याला संबंध नाही."अयमात्मा" असेही त्याचे स्वरूप नाही."ओंकार" ज्याने व्यक्त केले जाते, अशा वाच्यापासूनही आत्मा रहित आहे.सर्व प्रकारच्या वर्णनांपासून तो मुक्त आहे.तीन अवस्थांपासून (जाग्रत, स्वप्न, सुषुप्ति) तो अलिप्त आहे.तो अक्षर (अविनाशी) आत्मा आहे आणि चैतन्यस्वरूप आहे.आत्मा हा

जाणण्याजोग्या वस्तूंमध्ये मोडत नाही.जे काही दिसते किंवा जाणवते, त्याहून वेगळा तो आत्मा आहे.त्याला भान आणि अ-भान या दोन्ही अवस्थांचा स्पर्श नाही.अशा आत्म्याला जाणणारी वैदेही (सीता) आधीच मुक्त आहे.

**आत्मानमेव वीक्षस्व आत्मानं बोधय स्वकम् ।**
**स्वमात्मानं स्वयं भुङ्क्ष्व स्वस्थो भव षडानन ॥ ८० ॥**

सरते शेवटी भगवान शिव म्हणतात, हे षडानन कार्तिकेया, या सर्व श्रवणानंतर स्वस्वरूप ओळख ,स्वत:ला जाणून घे आणि स्वस्वरूपातच स्वत:ला स्थिर ठेव.

**स्वमात्मनि स्वयं तृप्तः स्वमात्मनि स्वयं चर**
**आत्मानमेव मोदस्व वैदेही मुक्तिको भवेत् ॥**

स्वत:च्या आत्म्यातच स्वत: तृप्त रहा. अतृप्त आत्मा हा कधीही स्थिर नसतो, याचे सदैव स्मरण असू द्या. आत्म्यातच विहार करा, आत्म्यातच आनंदाचा अनुभव घ्या आणि अशाप्रकारे विदेहमुक्त व्हा.

**।।इति तेजोबिंदुपनिषत्सु चतुर्थोध्याय:।।**

## ॥ अथ पञ्चमोऽध्यायः ॥

**निदाघो नाम वै मुनिः पप्रच्छ ऋभुं भगवन्तमात्मानात्म**

**-विवेकमनुब्रूहीति ।**

**स होवाच ऋभुः ।**

**सर्ववाचोऽवधिर्ब्रह्म सर्वचिन्तावधिर्गुरुः ।**
**सर्वकारणकार्यात्मा कार्यकारणवर्जितः॥१॥**

निदाघ नावाच्या मुनींनी भगवान् ऋभू यांना विचारले, कि मला आत्मा अनात्म तत्त्वाबद्दल समजावून सांगा. जेणेकरून आत्म-अनात्म तत्त्व म्हणजे काय हे मला समजू शकेल.ऋभू म्हणाले, सर्व वेदांची सीमा तर ब्रह्मच आहे.सर्व चिंतन त्याच्यावरच येऊन थांबते अर्थात् चिंतनाची एकमेव मर्यादा तेच तत्त्व आहे.ते गुरुतत्त्व आहे गुरु अर्थात्त मोठे म्हणजेच ते सर्वांपेक्षा श्रेष्ठ आहे. तेच सर्वांचे कारण आहे कारण त्यापासून हे जग निर्माण तर होते पण त्यला कुणीही निर्माण करू शकत नाही.म्हणजेच याचे कोणीही कार्य नाही हे येथे समजावे.

**सर्वसंकल्परहितः सर्वनादमयः शिवः ।**
**सर्ववर्जितचिन्मात्रः सर्वानन्दमयः परः॥२॥**

त्या तत्त्वाविषयी पुढे सांगताना म्हणतात, ते सर्वविध तत्त्वांनी रहित आहे, नादमय आहे , शिव अर्थात् पवित्र आहे, सर्व स्थूल, सूक्ष्म पदार्थांपासून भिन्न आहे,चिन्मात्र सर्वानन्दमय आणि सर्वोत्कृष्ट आहे.

**सर्वतेजः प्रकाशात्मा नादानन्दमयात्मकः ।**
**सर्वानुभवनिर्मुक्तः सर्वध्यानविवर्जितः ॥ ३॥**

तेच सर्वांचे तेज व प्रकाश आहे,नाद, आनन्दस्वरूप आहे, सर्वच अनुभवांपेक्षा वेगळे आहे सर्वप्रकारच्या ध्यानापासून रहित आहे.

**सर्वनादकलातीत एष आत्माहमव्ययः।**
**आत्मानात्मविवेकादिभेदाभेदविवर्जितः ॥ ४ ॥**

आत्म -अनात्म च्या संदर्भात ऋभू मुनी पुढे सांगतात की ते नादसंबंधीत सर्व कलेच्या 21पल्याड आहे,आत्मा,अव्यय आणि तेच माझे स्वरूप आहे. तेच आत्मा -अनात्मा विवेक आणि भेद-अभेदाच्या पलिकडचे आहे.

**शान्ताशान्तादिहीनात्मा नादान्तर्ज्योतिरूपकः ।**
**महावाक्यार्थतो दूरो ब्रह्मास्मीत्यतिदूरतः ॥५॥**

शांत -अशांत अशा मर्यादेत बांधल्या जाऊ शकत नाही. नादाच्याही आत ज्या अंतर्गत ज्योती आहे, अर्थात् जो याचे कारण आहे तेच आणि तेच ब्रम्ह आहे.' अहं ब्रम्हास्मि ' इत्यादी महावाक्यांच्या सीमेपासून अतिशय दूर आहे.

**तच्छब्दवर्ज्यस्त्वं शब्दहीनो वाक्यार्थवर्जितः ।**
**क्षराक्षरविहीनो यो नादान्तर्ज्योतिरेव सः ॥ ६॥**

' तत् शब्द ' यापासून सुद्धा आपल्याला कोणतेच ज्ञान प्राप्त होत नाही. 'सर्व 'हा शब्द देखील यासाठी पुरेसा नाही. तो वाक्यार्थाच्या पलीकडचा आहे. ते अक्षर ही नाही किंवा क्षरही नाही. नादाच्या अंतर्गतही हेच आहे.

**अखण्डैकरसो वाहमान्दोऽस्मीतिवर्जितः ।**
**सर्वातीतस्वभावात्मा नादान्तर्ज्योतिरेव सः ॥ ७॥**

ते अखंड एकरसाचे उत्तम उदाहरण आहे. 'अहं आनंदो अस्मि ' अर्थात् मी आनंदस्वरूप आहे, इत्यादीबद्दल देखील स्पष्ट वाच्यता यातून होत नाही. सर्वातीत होणे हा त्याचा स्वभाव आणि स्वरूप आहे. नादातील विद्यमान ज्योतीरूपही हेच आहे.

**आत्मेति शब्दहीनो य आत्मशब्दार्थवर्जितः ।**
**सच्चिदानन्दहीनो य एषैवात्मा सनानतः ॥८॥**

त्याला आत्मा या शब्दाने देखील प्रकट करता येऊ शकत नाही. आत्मा या शब्दाचा अर्थ तद्रूप नाही. इतकेच काय तर सच्चिदानंद या अलौकिक शब्दानेही त्याला व्यक्त करता येऊ शकत नाही, तर तोच सनातन आत्मा आहे, हेच खरे!

**स निर्देष्टुमशक्यो यो वेदवाक्यैरगम्यतः ।**
**यस्य किंचिद् बहिर्नास्ति किंचिदन्तः कियन्न स॥ ९ ॥**

आत्म- अनात्म याचे कोणत्याच शब्दात वर्णन करता येऊ शकत नाही. वेदवाक्यांनी देखील त्याचा अर्थ लक्षात येऊ शकत नाही. हे पदार्थ तत्व असे आहे की ज्याच्या आतही काही नाही किंवा बाहेरही काही नाही, असेच म्हणणे रास्त ठरेल.

**यस्य लिङ्गं प्रपञ्चं वा ब्रह्मैवात्मा न संशयः ।**
**नास्ति यस्य शरीरं वा जीवो वा भूतभौतिकः ॥ १० ॥**

त्याचे लिंग अर्थात् त्याचे सूचना देण्याचे साधन हा विश्व प्रपंच आहे. सर्वांचा आत्मा हा ब्रम्ह रूपच आहे,हे नि:संशय ! त्याचे शरीरही नाही, जीव नाही, स्वरूप नाही, किंवा कोणतेही भूत भौतिक पदार्थही नाही.

**नामरूपादिकं नास्ति भोज्यं वा भोगभुक् च वा ।**
**सद्वाऽसद्वा स्थितिर्वापि यस्य नास्ति क्षराक्षरम् ॥ ११ ॥**

या श्लोकात काय काय नाही हे सविस्तरपणे सांगताना, नाम नाही, रूप नाही, भोज्य नाही, भोग -भोक्ता नाही असे विवरण आले आहे. त्याची सद्-असद् रूपी स्थिती नाही किंवा क्षर-अक्षर रूपही नाही.

**गुणं वा विगुणं वापि सम आत्मा न संशयः ।**
**यस्य वाच्यं वाचकं वा श्रवणं मननं च वा॥१२॥**

ते गुणरूप नाही किंवा विगुणरूपही नाही ; तर ते आत्मा सम स्वरूप आहे ,यात कोणतीही शंका नाही. त्याचा कुणीही वाच्य नाही किंवा वाचकही नाही.त्याला आपण ऐकू शकत नाही आणि पूर्णपणे मननही करू शकत नाही.

**गुरुशिष्यादिभेदं वा देवलोकाः सुरासुराः ।**
**यत्र धर्ममधर्मं वा शुद्धं वाशुद्धमण्वपि ॥१३॥**

गुरू-शिष्य असा भेद त्यात नाही. देवलोकातील सूर-असूर असाही भेद त्यात नाही. त्याचप्रमाणे धर्म -अधर्म, शुद्ध -अशुद्ध यांचा देखील त्याला स्पर्श झालेला नाही.

**यत्र कालमकालं वा निश्चयः संशयो न हि ।**
**यत्र मन्त्रममन्त्रं वा विद्याविद्ये न विद्यते ॥१४ ॥**

यापुढे आणखी कोणकोणते भेद नाहीत याबद्दल विवरण आलेले आहे. काल-अकाल भेद, निश्चय -संशय भेद, मंत्र -अमंत्र भेद, विद्या -अविद्या इ. भेदरहित आहे.

**द्रष्टृदर्शनदृश्यं वा ईषन्मात्रं कलात्मकम् ।**
**अनात्मेति प्रसङ्गो वा ह्यनात्मेति मनोऽपि वा ॥ १५ ॥**

ते द्रष्टा, साधन आणि दृश्य यापेक्षा भिन्न आहे. किंचितमात्र कलात्मकता त्याच्यात नाही. आत्मा -अनात्माचा प्रसंग किंवा अनात्म मनही त्यात नाही.

**अनात्मेति जगद्वापि नास्ति नास्तीति निश्चिनु ।**
**सर्वसंकल्पशून्यत्वात्सर्वकार्यविवर्जनात् ॥१६॥**

ते अनात्म आहे. तेच जगत आहे असे देखील म्हणू शकत नाही किंवा नाही असेही म्हणता येत नाही. सर्व संकल्परहित आणि सर्व कार्य -पदार्थांच्या पलिकडचे आहे.

**केवलं ब्रह्ममात्रत्वान्नास्त्यनात्मेति निश्चिनु|**
**देहत्रयविहीनत्वात्कालत्रयविवर्जनात् ॥ १७ ॥**

वरील सर्व श्लोकातून आत्म -अनात्म काय काय नाही याचे विवेचन केल्यानंतर या श्लोकातील पहिल्याच चरणात सांगितले आहे की ते केवळ ब्रम्हमात्र आहे. अनात्म नाही असे निश्चयपूर्वक समजले पाहिजे. कारण त्यात स्थूल, सूक्ष्म आणि कारण देह नाही आणि भूत, भविष्य, वर्तमान काळाची सीमेनेही ते बांधलेले नाहीत.

**जीवत्रयगुणाभावात्तापत्रयविवर्जनात्**
**लोकत्रयविहीनत्वात्सर्वमात्मेति शासनात्॥१८॥**

प्रत्येक जीवात एकत्र वास करणारे सत्व, रज, तम यांचा यात अभाव दिसून येतो. त्रितापरहित आहे. ते सर्वात्मस्वरूप असल्यामुळे भूलोक, अंतरिक्ष लोक आणि द्युलोक यापेक्षा भिन्न आहे.

**चित्ताभावाच्चिन्तनीयं देहाभावाज्जरा न च ।**
**पादाभावाद्गतिर्नास्ति हस्ताभावात्क्रिया न च ॥ १९ ॥**

त्यात चित्ताचा अभाव असल्यामुळे चिंतन करणे शक्य नाही. देह नसल्यामुळे वृद्धावस्थेचा संसर्ग पोहचू शकत नाही. शारीरिक चलनवलन पायाच्या अभावामुळे होणे शक्य नाही. तर हाताच्या अभावामुळे क्रिया होऊ शकत नाही.

**मृत्युर्नास्ति जनाभावद्बुद्ध्यभावात्सुखादिकम्।**
**धर्मो नास्ति शुचिर्नास्ति सत्यं नास्ति भयं न च ॥ २० ॥**

जन्म नाही, म्हणून मृत्यू नाही. बुद्धी 26नसल्यामुळे सुखाची कल्पना केली जाऊ शकत नाही. धर्म नाही, शुचिता नाही, सत्य नाही आणि भयाचा लवलेशही त्यात नाही.

**अक्षरोच्चारणं नास्ति गुरुशिष्यादि नास्त्यपि ।**
**एकाभावे द्वितीयं न न द्वितीये न चैकता॥ २१ ॥**

त्याच्या द्वारे वर्णाचे उच्चारण होत नाही, त्याचप्रमाणे गुरू-शिष्य हे भावही त्यात नसतात. कारण त्याच्यासारखे दुसरे काहीच नाही. म्हणूनच त्याला एकही म्हणू शकत नाही किंवा द्वितीय  असे देखील म्हणू शकत नाही.

**सत्यत्वमस्ति चेत्किंचिदसत्यं न च संभवेत् ।**
**असत्यत्वं यदि भवेत्सत्यत्वं न घटिष्यति॥२२॥**

सत्यता जर त्यात असेल तर असत्यतेची संभावनाच नाही आणि असत्यता नाही तर सत्यता ,विशेषण त्यात प्रयुक्त होऊ शकत नाही.

**शुभं यद्यशुभं विद्धि अशुभाच्छुभमिष्यते ।**
**भयं यद्यभयं विद्धि अभयाद्भयमापतेत् ॥२३॥**

शुभ आणि अशुभाचा,भय-अभयचा प्रयोग सापेक्ष दृष्टीने केल्या जातो. अर्थात् शुभ -अशुभ, भय-अभय, अशा भावनांची संभावना केल्या जाऊ शकत नाही.

**बन्धत्वमपि चेन्मोक्षो बन्धाभावे क्व मोक्षता ।**
**मरणं यदि चेज्जन्म जन्माभावे मृतिर्न च ॥२४॥**

हीच स्थिती बंधन -मोक्ष, जन्म -मृत्युच्या बाबतही दिसून येते. अर्थात् त्यात बंधन -मोक्ष, जन्म-मृत्यु ची संभावना केली जाऊ शकत नाही.

**त्वमित्यपि भवेच्चाहं त्वं नो चेदहमेव न ।**
**इदं यदि तदेवास्ति तदभावादिदं न च ॥ २५ ॥**

मी -तू हा भेद इथे राहू शकत नाही, कारण मी आला की तू आलाच .हीच स्थिती इतरही भावांना लागू होते, जसे.. मी, तुम्ही, हा…यासाठी देखिल हा प्रयोग करता येऊ शकत नाही.

**अस्तीति चेन्नास्ति तदा नास्ति चेदस्ति किंचन ।**
**कार्यं चेत्कारणं किंचित्कार्याभावे न कारणम्॥२६॥**

जर त्याचा अभाव संभवनीय असता तर, ' तो यावेळी आहे ' असं म्हणता आलं असतं… ………………

**द्वैतं यदि तदाऽद्वैतं द्वैताभावे द्वयं न च ।**
**दृश्यं यदि दृगप्यस्ति दृश्याभावे दृगेव न॥२७॥**

जिथे द्वैत आहे, तिथे अद्वैत असणारच. आणि अद्वैत च्या जोडीने द्वैत हे येणारच. परंतु दोन्हीपैकी काहीच नाही म्हणजेच न द्वैत आहे ना अद्वैत, या विषयावर चर्चा तर नक्कीच होऊ शकते.

**अन्तर्यदि बहिः सत्यमन्ताभावे बहिर्न च।**
**पूर्णत्वमस्ति चैत्किंचिद्पूर्णत्वं प्रसज्यते ॥२८॥**

जर त्याच्या आत काही आहे असे म्हटले तर बाहेरही काही असणार हे सत्य पटू शकणारे आहे.

**तस्मादेतत्क्वचिन्नास्ति त्वं चाहं वा इमे इदम्।**
**नास्ति दृष्टान्तिक सत्ये नास्ति दार्ष्टान्तिकं ह्यजे ॥२९॥**

हेच कारण आहे कि हे सर्व त्याच्यात आहे असा प्रयोग मूढवत् ठरेल, तू, मी, हा,हे, याप्रकारचे सर्वनामाचे प्रयोग त्यासाठी करणे उचित ठरणार नाही. त्यासाठी न द्रष्टा ना दृष्टांत (उदाहरण) याचे कथन होऊ शकत नाही. कारण

उदाहरण द्यायला त्याच्यासारखे दुसरे कोणीतरी हवे, ते नाही म्हणून ते शक्य होत नाही.

**परंब्रह्मस्मीति स्मरणस्य मनो न हि ।**
**ब्रह्ममात्रं जगदिदं ब्रह्ममात्रं त्वमप्यहम् ॥३०॥**

त्यात या मनाचा अन्तर्भाव नसल्याने मी परब्रह्म आहे हा विचार देखील ते करु शकत नाही.ते जगत् देखील ब्रह्ममात्र आहे आणि तू देखील ब्रह्ममात्र आहे. अर्थात् ते तत्त्व विश्वमय व विश्वोत्तीर्ण आहे असे सांगण्याचा येथे प्रयास केला आहे.

**चिन्मात्रं केवलं चाहं नास्त्यनात्म्येति निश्चिनु।**
**इदं प्रपञ्चं नास्त्येव नोत्पन्नं नो स्थितं क्वचित् ॥ ३१ ॥**

मी केवळ चिन्मात्र आहे, आत्मा अनात्मा बद्दल सांगता येणार नाही

(मात्र हे निश्चित माना की मी चैतन्य आहे)हा विश्व म्हणजे (प्रपंच) पसारा नव्हे, हा उत्पन्न ही झाला नाही वा स्थिरही झाला नाही.

**चित्तं प्रपञ्चमित्याहुर्नास्ति नास्त्येव सर्वदा।**
**न प्रपञ्चं न चित्तादि नाहंकारो न जीवकः ॥३२॥**

चित्त म्हणजे प्रपंच आहे, तसे पहिले तर ते देखील (शेवटी) नाही,सर्वथा ,नित्य नाही.न संसार, न अहंकार ,न जीव नित्य आहे. (हे क्षणभंगुर आहे असे येथे प्रतिपादित करायचे आहे.)

**मायाकार्यादिकं नास्ति माया नास्ति भयं नहि।**
**कर्ता नास्ति क्रिया नास्ति श्रवणं मननं नहि॥३३ ॥**

हे मायेचे कार्य आहे असे देखील म्हणणे उचित ठरणार नाही,कारण माया हि वस्तू नाही न भय,न कर्ता,न क्रिया,न श्रवण ,न मनन आहे.

(बौद्धांच्या नेति-नेति न्यायाप्रमाणे ते काय आहे ते सांगण्यासाठी ते काय नाही याचे विश्लेषण करित आहेत असे प्रतीत होते.)

**समाधिद्वितयं नास्ति मातृमानादि नास्ति हि**
**अज्ञानं चापि नास्त्येव ह्यविवेकं कदाचन ॥३४॥**

संप्रज्ञात व असम्प्रज्ञात या दोन्ही समाधी नाही, ज्ञाता व ज्ञान देखील नाही,अज्ञान पण नाही व अविवेकाची सत्ता देखील शाश्वत (नेहमी) राहत नाही.

**अनुबन्धचतुष्कं न संबन्धक्षयमेव न।**
**न गङ्गा न गया सेतुर्न भूतं नान्यदस्ति हि॥३५॥**

अनुबंधचतुष्क, संबंधत्रय देखील नाही,गंगा आदी नदया, गया आदी तीर्थक्षेत्र रामेश्वरच्या समीप असलेला सेतुबंधही नाही.भूतकाळ देखील नाही,अशाप्रकारे ब्रह्माशिवाय इतर काहीही सत्य नाही. येथे सत्य याचा अर्थ शाश्वत असाच घेणे रास्त ठरेल.

**न भूमिर्न जलं नाग्निर्न वायुर्न च खं क्वचित् ।**
**न देवा न च दिक्पाला न वेद न गुरुः क्वचित्॥३६॥**

न भूमी सत् आहे,न जल सत् आहे,न अग्नी सत् आहे, न वायु सत् आहे, न आकाश सत् आहे,न देवता ,न दिक्पाल न वेद ,न गुरु सारे काही अशाश्वत आहे, एकमेव ब्रह्म सत्य आहे.

अद्वैत वेदांताचा येथे “ब्रह्म एव सत्यं जगन्मिथ्या|” या सिद्धांताचे वारंवार प्रतिपादन येथे केल्याचे आढळते.

**न दूरं नान्तिकं नान्त्यं न मध्यं न क्वचित्स्थितम् ।**
**नाद्वैतं द्वैतसत्यं वा ह्यसत्यं वा इदं न च॥३७॥**

न दूर आहे न निकट (जवळ) आहे,ना काही अन्त्य आहे तर ना काही मध्य

हे कधीही स्थिर नाही, न द्वैत आहे ना अद्वैत, न सत्य आहे न असत्य या सर्वांपैकी काहीही नाही अर्थात् ब्रह्मतत्त्व यापासून भिन्न आहे असे सांगायचे आहे.

**बन्धमोक्षादिकं नास्ति सद्वाऽसद्वा सुखादि वा**
**जातिर्नास्ति गतिर्नास्ति वर्णो नास्ति न लौकिकम् ॥३८॥**

हे बंधन वा मोक्षवत् नाही,सत् नाही असत् ही नाही,सुख नाही, दु:ख नाही न जाति, न गती, न वर्ण, न लौकिक आहे. याहूनही भिन्नच आहे.

**सर्वं ब्रह्मेति नास्त्येव ब्रह्म इत्यपि नास्ति हि।**
**चिदित्येवेति नास्त्येव चिदहंभाषणं नहि ॥३९॥**

सर्वं ब्रह्म असे मःन्तले तरीहि ते सार्थ नाही कारण सर्व याचि सत्ताच नाही,हे ब्रह्म आहे असे दाखवता ही येत नाही,मि चित्त आहे हे विशेषण हि लावता येत नाही. म्हणजेच ते सर्व या शब्दातीत आहे असे सांगण्याचा मानस आहे.

**अहं ब्रह्मास्मि नास्त्येव नित्यशुद्धोऽस्मि न क्वचित् ।**
**वाचा यदुच्यते किंचिन्मनसा मनुते क्वचित्॥४०॥**

मी ते ब्रह्मतत्त्व आहे असे सांगता येत नाही, मी नित्य, शुद्ध-बुद्ध आहे, असे देखील सांगता येत नाही, वाणीद्वारा ज्याचे कथन केले जाते, संकल्पांनी ज्याची कल्पना केली जाते,मनात ज्याचे चिंतन केले जाते, ते खरे ब्रह्मतत्त्व नाही.

**बुद्धया निश्चिनुते नास्ति चित्तेन ज्ञायते नहि।**
**योगी योगादिकं नास्ति सदा सर्वं सदा न च॥४१॥**

ज्याचा बुद्धीने निश्चय करता येईल किंवा जे चित्ताने जाणता येईल हे आसे तत्त्व देखील नाही.हा योग्यांचा योग देखील नाही, सदा सर्वदा हे असे काही आहे असे ही म्हणणे उचित ठरत नाही.

**अहोरात्रादिकं नास्ति स्नानध्यानादिकं नहि ।**
**भ्रान्तिरभ्रान्तिर्नास्त्येव नास्त्यनात्मेति निश्चिनु ॥ ४२ ॥**

दिन –रात्र, स्नान-ध्यान ,भ्रांती-अभ्रांती आदि देखील हे नाही.कारण ते आत्मरूप नाही असत् आहे.असे निश्चयाने जाणावे.

**वेदशास्त्रं पुराणं च कार्यं कारणमीश्वरः ।**
**लोको भूतं जनस्त्वैक्यं सर्वं मिथ्या न संशयः ॥४३॥**

वेद ,शास्त्र, पुराण, कार्य ,कारण, ईश्वर, लोक पंचमहाभूत, जन अर्थात् मनुष्य सूर्य सर्व मिथ्या आहे, यात यत्किंचितही संदेह नाही.

**बन्धो मोक्षः सुखं दुःखं ध्यानं चित्तं सुरासुराः ।**
**गौणं मुख्य परं चान्यत्सर्व मिथ्या न संशयः ॥ ४४ ॥**

बंधन, मोक्ष, सुख आणि दुःख, ध्यान, मन,देव, राक्षस, गौण, मुख्य, पर, अपर आणि ही इतर सर्व विधाने निःसंशयपणे खोटी आहेत.

**वाचा वदति यत्किचित्संकल्पैः कल्प्यते च यत् ।**
**मनसा चिन्त्यते यद्यत्सर्व मिथ्या न संशयः ॥ ४५ ॥**

जे वाणीने वर्णन केले जाते, जे विचारांनी कल्पिले जातेजे मनाने चिंतन केले जाते ते सर्व नि:संशय खोटे आहे.

**बुद्ध्या निश्चीयते किंचिधित्ते निश्चीयते क्वचित् ।**
**शास्त्रैः प्रपश्यते यद्यत्रेत्रेणैव निरीक्ष्यते ॥ ४६॥**

**श्रोत्राभ्यां श्रूयते यद्यदन्यत्सद्भावमेव च ।**
**नेत्रं श्रोत्रं गात्रमेव मिथ्येति च सुनिश्चितम् ॥४७॥**

जे आपण बुद्धीने ठरवतो, जे मनाने ठरवतो ते शास्त्राच्या माध्यमातून ज्याचे वर्णन केले जाते, जे डोळयांनी पाहिले जाते, जे श्रोत्रांनी  ऐकले होते. किंवा जे दुसरे अस्तित्व मानले जाते, डोळे, श्रवण, शरीर हे सर्व निश्चितपणे खोटे आहे.अर्थात् अंतिम सत्य नाही.

**इदमित्येव निर्दिष्टमयमित्येव कल्प्यते ।**
**त्वमहं तदिदं सोऽहमन्यत्सद्भावमेव च ॥४८॥**

**यद्यत्संभाव्यते लोके सर्वसंकल्पसंभ्रमः ।**
**सर्वाध्यासं सर्वगोप्यं सर्वभोगप्रभेदकम् ॥ ४९ ॥**

**सर्वदोषप्रभेदाच नास्त्यनात्मेति निश्चिनु ।**
**मदीयं च त्वदीयं च ममेति च तवेति च॥५०॥**

‘हे' या शब्दाने आपण ज्याचा संदर्भ घेतो, आपण 'हा' द्वारे काय कल्पना करतो . तू, मी, ते, हे, हा, तो मी आहे इतर जे काही सत्य मानले जाते, जगात जे काही अपेक्षित आहे ते संकल्प आणि भ्रममात्र आहे.काही अध्यास आहेत, सर्व गोपनीय, भोगयुक्त हे सर्व भेद मिथ्या आहेत.माझे ,तुझे असे काहीच नाही. (अर्थात् हा केवळ शब्दांचा खेळ आहे असे आपल्याला सोप्या शब्दात सांगता येईल.  हे सर्व दोषाचे प्रसंग आहेत, आत्म्याचे नाही.

**मह्यं तुभ्यं मयेत्यादि तत्सर्वं वितथं भवेत् ।**
**रक्षको विष्णुरित्यादि ब्रह्मा सृष्टेस्तु कारणम्॥५१॥**

**संहारे रुद्र इत्येव सर्व मिथ्येति निश्चिनु**
**स्नानं जपस्तपो होमः स्वाध्यायो देवपूजनम्॥५२॥**

**मन्त्रं तन्त्रं च सत्सङ्गो गुणदोषविजृम्भणम् ।**
**अन्तःकरणसद्भावे ह्यविद्यायाश्च संभवः॥५३॥**

माझ्यासाठी, तुझ्यासाठी, माझ्याद्वारे वगैरे सर्व मिथ्या आहेत, विष्णू रक्षक आहे, ब्रह्मा कर्ता आहे, रुद्र संहारक आहे, हे सर्व मिथ्या आहेत.(तात्पुरते आहे असे येथे समजावे) स्नान, जप, तपश्चर्या, होम,गृह, स्वयंअध्ययन, देव-पूजा, मंत्र-तंत्र, सत्संग, गुण-दोषांची कल्पना, विवेक, यांची सर्वांची अविद्येतून उत्पत्ती झाली आहे, त्याबद्दल शंका नाही.

**अनेककोटिब्रह्माण्डं सर्वं मिथ्येति निश्चिनु**
**सर्वदेशिकवाक्योक्तिर्येन केनापि निश्चितम् ॥ ५४॥**

**दृश्यते जगति यद्यद्यद्यज्जगति वीक्ष्यते।**
**वर्तते जगति यद्यत्सर्वं मिथ्येति निश्चिनु॥५५॥**

विश्वाच्या अनेक श्रेणी आहेत, जसे की कोणीतरी ठरवले आहे, मूळ आचार्यांचे ते शब्दही खोटे आहेत हे समजून घ्या. (आचार्य वेदांत देशिक यांचे वैष्णव परंपरेतील सर्वोत्तम तत्त्ववेत्ता कोण मानला जातो हे येथे सूचित केले आहे) जो कोणी निश्चित आहे किंवा जगात जे काही दिसत आहे आणि जे काही आहे जगात ते खोटे आहे.

**येन केनाक्षरेणोक्तं येन केन विनिश्चितम्।**
**येन केनापि गदितं येन केनापि मोदितम्॥५६॥**

**येन केनापि यद्दतं येन केनापि यत्कृतम्।**
**यत्र यत्र शुभं कर्म यत्र यत्र च दुष्कृतम्॥५७॥**

